# संपादकीय

## बालसाहित्यक्षेत्रात स्कोलॅस्टिकचे पदार्पण

काही साध्या कल्पनाही अनेकदा अत्यंत परिणामकारक ठरतात; आणि भव्य यशाचा चिरस्थायी पाया घालतात. बालसाहित्याच्या क्षेत्रात अशीच एक कल्पना अभूतपूर्व यशोदायी ठरली आहे.

मुलांच्या हाती पुस्तके बालवयापासूनच पडायला हवीत; वाचनाची आवड ही लहान वयातच लागू शकते असे सर्वजण म्हणतात; आणि ते खरेही आहे. परंतु मुलांपर्यंत पुस्तके जाणार कशी हा प्रश्न काही मनासारखा सुटत नाही. पालकांना मुलांसाठी पुस्तके घेण्याची इच्छा होत नाही; त्यासाठी पैसे खर्च करण्याची क्षमता काहीवेळा त्यांच्यात नसते; क्षमता असलीतरी कॅडबरी, आइस्क्रीम, कपडे, क्रीडावस्तू वगैरे बाबींवर खर्च करण्यात त्यांना आनंद वाटतो. पुस्तकांवर खर्च करणे त्यांच्या जीवावर येते. एकदाच जे वाचायचे आणि बाजूला टाकायचे - त्या पुस्तकावर खर्च करणे त्यांना बेहिशोबीपणाचे वाटते. शाळांमध्ये ग्रंथालये असतात; परंतु त्या ग्रंथालयातील पुस्तके फाटू नयेत, खराब होऊ नयेत म्हणून शिक्षक त्या ग्रंथालयातील पुस्तकांची कपाटे कधी उघडतच नाहीत. वर्षअखेर पुस्तकांचा हिशेब द्यावा लागतो. कारण पुस्तके ही सरकारची मालमत्ता असते. साहजिकच मुलांच्या हाती पुस्तके पडत नाहीत. मुलांना पुस्तके वाचायला मिळत नाहीत. काही नावाजलेल्या शाळांमध्ये ऑफ तासाला वर्गात पुस्तकांची पेटी फिरवली जाते; परंतु बहुतेक ठिकाणी मुख्याध्यापकांना व संस्थाचालकांना ग्रंथालय म्हणजे एक डोकेदुखीच वाटते. मुलांनी अभ्यासाची पुस्तके तेवढी मन:पूर्वक वाचली तरी खूप झाले. परीक्षेत पास होण्यापुरते गुण मिळवले म्हणजे गंगेत घोडे न्हाले - त्यापलीकडे ज्ञानसंपादन हे अनावश्यक आहे असे ते मानतात. तेव्हा पुस्तके मुलांच्या हाती पोचवण्याची त्यांना तशी गरज वाटत नाही; ते आपले कर्तव्य आहे ही भावना मग दूरच! काही पालकांना व मुलांना पुस्तके वाचावीशी वाटतात; परंतु जवळपास पुस्तकविक्रीची केंद्रे नसतात, हवी ती पुस्तके मिळत नाहीत; पुस्तकांच्या किंमती जास्त वाटतात इ.इ. तक्रारीही कानावर येतात. काही पालकांना मुलांसोबत पुस्तकांच्या दुकानात जायला वेळ नसतो.

—परंतु तरीही मुलांच्या हाती पुस्तके पडायला हवीत अशी निकड उरतेच.

पुस्तकांद्वारेच मुलांच्या ज्ञानात चौफेर भर पडते, त्यांच्यावर उत्तम संस्कार होतात, त्यांची आकलनक्षमता वाढते, त्यांची भाषाशैली संपन्न होते, त्यांची अभिव्यक्तीची कक्षा रुंदावते, जगण्यासाठी ज्ञानाची, अभ्यासाची, विविध विषयांतील



समस्या हाताळण्याची, समाजाशी व सहकाऱ्यांशी मिळतेजुळते घेण्याची गरज असते. पुस्तकांद्वारे ती गरज काही अंशी तरी पूर्ण होऊ शकते. पुस्तके बालवाचकांच्या हाती जावी म्हणून ग्रंथजत्रा, पुस्तक प्रदर्शने, वाचन स्पर्धा बालमेळावे वगैरे उपक्रम उपयुक्त ठरतात. जगभर त्याबाबत प्रयोग चालू आहेत. जगातील बालसाहित्यक्षेत्रातील सर्वात मोठी प्रकाशन संस्था असा जिचा लौकिक आहे, ती मूळ अमेरिकन असलेली स्कोलॅस्टिक कंपनी आता भारतातही एका वर्षापासून कार्यरत आहे, दिल्लीत तिचे मुख्य कार्यालय आहे आणि तिचे एक कार्यालय पुण्यातही आता सुरू होत आहे. स्कोलॅस्टिक इंडिया या नावाने बालसाहित्यक्षेत्रात या प्रकाशनसंस्थेच्या कामाचा व्याप पुढे वाढत राहणार आहे. नॅशनल बुक ट्रस्टचे माजी प्रमुख अरविंदकुमार हे स्कोलॅस्टिक इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक आहेत.

या संस्थेचे सर्वात मोठे वैशिष्ट्य काय आहे?

बालसाहित्याच्या विक्रीसाठी व प्रचारांसाठी ही प्रकाशन संस्था शाळांचे माध्यम वापरते. चांगल्या शाळा निवडून त्या शाळांमध्ये ही संस्था आपल्या पुस्तकांचे प्रदर्शन भरवते. वयाच्या व इयत्तांच्या गटानुसार या संस्थेतर्फे पुस्तके काढण्यात आलेली आहेत. पूर्वप्राथमिक ते तिसरी, चौथी-पाचवी, सहावी ते आठवी व त्यापुढील वर्ग अशी वर्गवारी करून या पुस्तकांची निर्मिती करण्यात या संस्थेने दीर्घकाळ संशोधन करून काही निश्चित मार्गदर्शक सूत्रे ठरवलेली आहेत. त्यानुसार पुस्तकांची निर्मिती केली जाते. सुमारे दहा हजार पुस्तके या प्रकाशन संस्थेच्या यादीत असून दरवर्षी त्यांच्या २५ कोटींवर प्रती विकल्या जातात. अमेरिकेतील ९० टक्के शाळांमध्ये या संस्थेची पुस्तके व शैक्षणिक साधने वापरण्यात येतात. केवळ मुद्रित पुस्तकेच नव्हे तर दृकश्राव्य शैक्षणिक साधने, व्हिडियो व टीव्ही गेम्स, सीडी-रोम यांचीही निर्मिती ही संस्था करते. निरनिराळी ३७ क्लासरूम मासिके ही संस्था चालवते. कथाकादंबऱ्या,

विज्ञानविषयक पुस्तके, रंगकाम-चित्रकला-हस्तकला वगैरे कला व छंद यावरची पुस्तके, वेगवेगळ्या प्रकारचे कोश व ज्ञानकोश, इतिहास-भूगोल-पर्यावरण-संगणक-इंटरनेट वगैरे विषयांवरची पुस्तके, क्लासिक्स इ. तऱ्हेतऱ्हेची पुस्तके या संस्थेच्या यादीत आहेत.

—परंतु विक्रीसाठी मात्र शाळांचे माध्यम हे या प्रकाशनसंस्थेने उत्तम प्रकारे राबविलेले आहे. त्याचबरोबर वेगवेगळ्या वर्गांसाठी बुकक्लब-वाचकवृंद काढून त्यांना पुस्तके उपलब्ध करून देण्याच्या योजनेचाही पाठपुरावा केला जात आहे. अमेरिकेत गेली पन्नास वर्षे स्कोलॅस्टिक बुक क्लबचे कार्य चालू आहे. भारतात या बुकक्लबचे वर्षात पाच लाख सदस्य होतील व तेवढ्या कुटुंबांना पुस्तके मिळत राहतील असा अंदाज आहे.

शाळांमध्ये आपल्या पुस्तकांची प्रदर्शने भरवणे, मुलांना ती पुस्तके हवा तितका वेळ हाताळू देणे आणि आवडलेली पुस्तके सवलतीच्या किंमतीत विकत घेण्यास प्रोत्साहन देणे अशा तीन सूत्रांवर या प्रकाशन संस्थेने आपल्या प्रचाराची एकूण व्यूहरचना केलेली आहे.

ही पुस्तके पाहिल्यावर, वाचल्यावर आपल्या संग्रहात विकत घेऊन ठेवण्यासाठी ज्यांची निवड मुले करतील, त्या पुस्तकांची किंमत शाळेकडे ऑर्डर फॉर्मबरोबर द्यायची. पंधरा दिवसांनी शाळेकडून ती पुस्तके मुलांना मिळावीत अशी व्यवस्था या संस्थेने केली आहे. दिल्लीतील अडीचशे शाळांमध्ये या प्रकारे पुस्तक प्रदर्शन व विक्री-वितरण व्यवस्था गेल्या वर्षभरात उभी करण्यात आली आहे.

स्कोलॅस्टिकतर्फे आरंभी फक्त स्वतःच्या प्रकाशनांचीच विक्री होत असे; परंतु नंतर प्रकाशकांच्या निवडक पुस्तकांचेही वितरण हाती घेण्यात आले. स्कोलॅस्टिकसाठी स्वतंत्र आवृत्त्याही काढण्याएवढ्या प्रचंड मागण्या प्रकाशकांकडे येऊ लागल्या. गॅलिनॉन (फ्रान्स), असबॉर्न (इंग्लड), यांच्याप्रमाणेच नॅशनल बुक ट्रस्ट, चिल्ड्रेन्स बुक ट्रस्ट, रूपा प्रकाशन, पेंग्विन वगैरेंची पुस्तकेही स्कोलॅस्टिकतर्फे भारतात वितरित केली जात आहेत. मराठी वगैरे भाषांतील निवडक दर्जेदार पुस्तकांचेही ही संस्था शाळांशाळांमध्ये वितरण करील.

दरवर्षी ही संस्था तीन वेळा पुस्तकांची आकर्षक सूची प्रसिद्ध करते व शाळाशाळांना पाठवते. त्या पुस्तकांच्या प्रती शाळेत पहायला उपलब्ध व्हाव्यात म्हणून प्रदर्शन भरवते. मुलांनी त्यातील पुस्तकांची निवड करून, ऑर्डर फॉर्म भरून दिला की शाळा त्याप्रमाणे स्कोलॅस्टिक कंपनीकडे मागणी नोंदवते. त्याप्रमाणे पुस्तके नंतर पुरवण्यात येतात. शाळेच्या ग्रंथालयातही त्यामुळे मोफत पुस्तकांची भर पडत जाते.

१९२० साली एका शिक्षकाने या संस्थेची स्थापना केली; आणि आज शंभर देशांमध्ये या संस्थेच्या व्याप पसरलेला आहे. परदेशात पुस्तकांच्या किंमती या अधिक



असतात; मुलांची पुस्तके जाड कागदावर, भरपूर चित्रांनी युक्त आणि रंगीबेरंगी असतात. त्यामुळे किंमती जास्त राहतात. भारतासारख्या देशातील मुलांची क्रयशक्ती लक्षात घेऊन कमी खर्चात पुस्तकनिर्मिती कशी करायची हे एक जबरदस्त आव्हान आहे असे स्कोलॅस्टिकच्या उपाध्यक्ष श्रीमती कॅरोल सेकोइयान यांना वाटते. परंतु दर्जाबाबत आम्ही कसलीही तडजोड करणार नाही; दीर्घकालीन गुंतवणूक या दृष्टीने पुस्तक निर्मितीकडे पाहून नफ्याचे प्रमाण शक्य तेवढे कमी ठेवावे असे त्यांचे धोरण आहे.

स्कोलॅस्टिकतर्फे शिक्षकांसाठी 'सृजनशील अध्ययनावर कार्यशाळा घेण्यात येतात; विविध विषयांबाबत जिज्ञासा वाढावी म्हणून मुलांसाठीही आनंद मेळावे घेण्यात येतात. पंचवीस बालसाहित्यकारही स्कोलॅस्टिकच्या वतीने विद्यार्थ्यांबरोबर सतत वार्तालाप करीत, त्यांच्या आवडीनिवडी जाणून घेण्यासाठी शाळाशाळांमधून कार्यक्रम करीत असतात. या अशा या चर्चांचा परिणामही मोठा मजेशीर होतो. मुलांच्या वाढदिवसाच्या पार्ट्यांची या बालसाहित्यकारांना इतकी आमंत्रणे येतात की कुठे जायचे असा प्रश्न त्यांना पडतो. भारतातील विविध भाषांमुळेही स्कोलॅस्टिकपुढे अनेक प्रश्न उभे केले आहेत. कुठल्या भाषांना प्राधान्य द्यायचे हे ठरवणे अवघड जात आहे.

स्कोलॅस्टिकच्या भारतातील आगमनामुळे भारतीय भाषांतील बालसाहित्यकारांपुढे एक नवे दालन खुले होत आहे. दर्जेदार लेखनाला आता भाषेच्या किंवा देशाच्या मर्यादा राहणार नाहीत. आपले पुस्तक मौलिक असेल तर ते उत्तम रीतीने प्रसिद्ध होऊ शकेल; इतर भाषांमध्ये अनुवादित होऊन विकले जाऊ शकेल, आणि भारतभरच्या बालवाचकांपर्यंत पोचू शकेल. आपण लिहितो ते केवळ भारतीय बालवाचकासाठी लिहितो, केवळ विशिष्ट भाषिक वर्गासाठी वा वृत्तपत्रासाठी लिहितो पण आता आपण जागतिक बालवाचक पुढे ठेवला पाहिजे. आपल्याला उसनवारीपेक्षा स्वतंत्र बुद्धीने व प्रतिभेने नवी निर्मिती करणे आता क्रमप्राप्त आहे हेही लक्षात घ्यायला हवे. बालसाहित्य खपत नाही, अशी तक्रार करणाऱ्यांना स्कोलॅस्टिकच्या रूपाने एक नवीन संधी गवसेल यात शंका नाही. ऑपरेशन ब्लॅकबोर्डसारख्या सरकारी योजनांच्या लहरी घोळापेक्षा ही संधी अधिक फलदायी, प्रामाणिक व टिकाऊ ठरेल. भारतीय बालसाहित्याच्या प्रकाशकांपुढेही सामर्थ्यशाली स्पर्धकांशी टक्कर कशी द्यायची असा मोठा प्रश्न निर्माण होणार आहे. उदारीकरणाच्या प्रक्रियेमुळे आपणही आता जागतिक संदर्भातच आपल्या व्यावसायिक प्रगतीचे महत्त्वाकांक्षी नियोजन करणे अपरिहार्य आहे.

सुनील मेहता

**जळगाव येथे दि. ७-८ नोव्हेंबर रोजी झालेल्या पहिल्या समरसता साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. आनंद यादव यांच्या भाषणातील काही भाग**

## संभाव्य साहित्याची रूपरेषा

सामाजिक समरसता मंचाच्या संकल्पनेतून निर्माण होणाऱ्या संभाव्य साहित्याची सूत्ररूपाने रूपरेषा चर्चेसाठी मांडण्याचा हा पहिला प्रयत्न आहे.

१) प्राचीन आणि मध्ययुगीन भारतीय साहित्याची संकल्पना ही प्रामुख्याने धर्मप्रवण होती. त्यामुळे त्या साहित्यात तत्कालीन समाजदर्शन क्वचितच आणि तेही अनुषंगाने, तुरळक स्वरूपात येत होते. त्या साहित्याच्या बाबतीत आजच्या अर्थाने 'सामाजिक समरसतेचा पहिला प्रयत्न महाराष्ट्रात वारकरी संतांनी मध्ययुगात साहित्यनिर्मितीच्या आणि प्रत्यक्ष वर्तनाच्याद्वारे केला होता, हे विसरता येत नाही. मात्र साहित्य आणि धर्मनिरपेक्ष सामाजिक समरसतेचा संबंध आधुनिक साहित्याच्या संदर्भातच प्रस्थापित करता येतो.

२) फ्रान्सच्या प्रसिद्ध राज्यक्रांतीनंतर आणि लोकशाहीची स्थापना जगाच्या पाठीवर काही राष्ट्रांत झाल्यानंतर आधुनिक साहित्याला बहर आलेला दिसतो. आधुनिक साहित्याच्या विविध प्रेरणांचा विकास उद्योगप्रधान, भांडवलशाही, लोकशाही काळात झाल्याने लोकमानसाची विविध अंगोपांगे साहित्यात प्रतिबिंबित होऊ लागली. त्याचबरोबर अशा साहित्याने लोकमानसाच्या विविध अंगोपांगांचे परिपोषणही होऊ लागले. साहित्य आणि लोकमानस, समाज-मानस यांचे परस्पर नाते जडले आणि त्यातूनच दोहोंचेही परिपोषण होत गेले. यातून आधुनिक साहित्याचा इतिहास घडत गेला. त्याच्या आधारे समाजाची व समाजमनाची नोंदही होत गेली. ही नोंद समाजमानसाचा सांस्कृतिक इतिहास होता.

३) पाश्चात्य समाजजीवनात आधुनिक साहित्याचा इतिहास दीर्घकाळ घडत गेला आहे. त्या आधुनिक साहित्याला वाट पुसतच मराठी आधुनिक साहित्याची निर्मिती होत राहिली.

४) याशिवाय वेगळ्या प्रकृतीचे आधुनिक साहित्य असू शकते. अर्थात ते निर्माण करणारा साहित्यिकसुद्धा वेगळ्या प्रकृतीचा असावा लागतो. प्रथम त्याने साहित्याचे आणि समाजाचे मूलभूत स्वरूप समजून घेण्याची आवश्यकता आहे. ते समजून घेतल्यावर अशा प्रकारच्या साहित्याचे आणि समाजाचे नाते प्रस्थापित करता येणाऱ्याची कुवत आपल्या साहित्यिक व्यक्तिमत्त्वात आहे की नाही, याचाही त्याने अंतर्मुख होऊन विचार करण्याची



गरज आहे. याचा दुसरा अर्थ असा की, प्रत्येक साहित्यिकाला निश्चितपणे सामाजिक समरसतेचे साहित्य लिहिता येईल, हे गृहीत धरणे चुकीचे आहे. तशी अपेक्षाही नसावी.

५) प्रस्तुत संदर्भात साहित्यिक, साहित्य आणि समाज यांचा एकत्र विचार करता येण्यासारखा आहे. साहित्यिक हा प्रथम साहित्यिक आहे, कोणत्याही साहित्यनिर्मितीसाठी आवश्यक असणारे गुण त्याच्या व्यक्तिमत्त्वात प्राथमिक स्वरूपात आहेत, हे गृहीत धरावे लागते, उदा. जन्मजात मिळणारी प्रतिभा, कल्पनाशक्ती, संवेदनशीलता, भावनाशीलता, तर्कशक्ती, स्फुरणशीलता साहित्यिकांच्या स्वभावधर्मातच असतात. त्यांना अभ्यासाची जोड द्यावी लागते, भाषेचा वापर माध्यम म्हणून करण्याची हातोटी, त्याला आत्मसात करावी लागते. प्रयत्नपूर्वक, कष्टपूर्वक निर्मिती करण्याची सोशिकता त्याला मिळवावी लागते. तरच तो कोणतीही साहित्यनिर्मिती यशस्वीपणे करू शकतो. त्यासाठी तो ज्या समाजात जन्माला आला त्या समाजातील साहित्याची स्थितीगती, इतिहास यांची जाण असेल तरच तो, त्या समाजाला आणि साहित्यप्रवाहाला 'मोलाची' वाटणारी अर्थपूर्ण साहित्यकृती निर्माण करू शकेल. कोणतीही अर्थपूर्ण कलानिर्मिती करण्यासाठी अनुभवसंचय विपुल आणि समृद्ध असावा लागतो.

६) सामाजिक जाणिवांचे (उदा. समरसतेचे) साहित्य त्या त्या समाजातील, वाचकवर्गावर अनेक अंगांनी प्रभाव टाकते. (अ) अशा साहित्यातील पात्रे वाचकाला आपल्याच समाजातील, आपल्या आसपास वावरणारी, आपल्याला भेटणारी, आपल्या ओळखीची वाटतात. घटना आणि प्रसंग त्याच्या स्व-जीवनातील घटना-प्रसंगाशी जुळणारे, जमणारे वाटतात. समाजात त्यानेही ते प्रसंग अनुभवलेले असतात. त्यामुळे प्राथमिक पातळीवर वाचकवर्ग अशा साहित्याशी चटकन समरस होतो. त्यामुळे त्या साहित्यातून निष्पन्न होणाऱ्या विचारावर चिंतन करतो, भावनेने एकजीव होतो, संवेदनानिशी त्याला भिडतो. या सर्वांचा परिणाम होऊन त्याचे मानसिक परिवर्तन होण्याची दाट शक्यता निर्माण होते. (ब) साहित्यिकाच्या मन:पूत सामाजिक समरसतेतून निर्माण झालेल्या साहित्याची भाषा ही समाजभाषा असते; म्हणजे समाज-बोली असते. एका अर्थी ती समाजाची लोकभाषा असते. त्यामुळे ती भाषाही वाचकाला आपली वाटते.

(क) समाजाशी समरस होऊन साहित्यिकाने केलेल्या निर्मितीत अनुभवाच्या पातळीवर सामाजिक मूल्ये एकजीव झालेली असतात. दुसऱ्या भाषेत असे म्हणता येईल की साहित्यिकाने आपल्या समाजाच्या स्थितिगतीच्या इतिहासाचा साहित्यिक दृष्टीने अभ्यास केलेला असल्यामुळे, तसेच धर्मतत्त्वे, रूढी, परंपरा इत्यादींचा परिचय असल्याने ती त्याच्या साहित्यकृतीतील अनुभवांतून स्पंदन पावत असतात. त्यामुळे मनाच्या तळात असलेली सामाजिक मूल्यांची सुप्त, अर्धसुप्त जाणीव घुसळली (किंवा डिवचली) जाऊन जागृत मनाच्या पातळीवर येते आणि वाचकांवर मूल्यात्मक परिणाम साधते.

(ड) साहित्यिकाने सामाजिक मानसशास्त्राचा, भारतीय तत्त्वज्ञानाचा अभ्यासही

केला असेल तर अशा प्रकारची समाजदर्शन घडविणारी साहित्यकृती समाजवास्तवाच्या पलीकडे जाऊन मानवी जीवनाचे विश्वात्मक दर्शनही घडवू शकते. कारण अशा प्रकारच्या अभ्यस्त सहित्यिकाला मानवी मनाच्या मूलभूत प्रेरणांचे व भारतीय मूलभूत आध्यात्मिक मूल्याचेही ज्ञान असल्याने त्याला समाजवर्तनामागे कार्य करणाऱ्या मूलभूत मानवी प्रेरणा व जीवनमूल्ये यांचेही भान असते. चांगली, समाजदर्शन घडविणारी साहित्यकृती वाचकाच्या मनाला सर्वांगांनी घेरते आणि त्याला स्वत:शी पूर्ण समरसून टाकते. खऱ्या अर्थाने ती वाचकाचे मनोरंजन करते. 'मनोरंजन'चा शब्दश: (वाच्यार्थ) अर्थ वाचकमनाला आपल्या रंगांनी रंगवून टाकणे असा आहे. त्या दृष्टीने वाचकाला ती 'तन्मय' करून टाकते. मात्र कोणतीही चांगली साहित्यकृती वाचकाचे मन समृद्ध करते, वाचकाला बदलून टाकते ती तिच्यातील प्रत्यक्ष वैचारिकतेमुळे नव्हे. खरे तर तिच्यात वैचारिकता प्रत्यक्ष स्वरूपात कुठेच नसते. चांगली साहित्यकृती तिच्यात व्यक्त झालेल्या चैतन्यपूर्ण, प्रौढ कलात्मक अनुभवाने वाचकाला चिंतनप्रवृत्त करते. त्या चिंतनामुळे प्राप्त सामाजिक स्थितीच्या संदर्भात वाचकाला परिवर्तनाची प्रेरणा मिळते.

७) १९४५ ते ६५ हा पूर्वप्रस्थापित मराठी साहित्यक्षेत्रात नववाङ्मयीन प्रवृत्तींचा प्रभाव असलेला काळ होता. या काळात साहित्यक्षेत्रात नवकविता, नवकथा, नवनाटक, नवसमीक्षा यांची निर्मिती आणि विचारविमर्श मोठ्या प्रमाणात चालू होता. हा काळ कलात्मक जाणिवांच्या विकासाचा जसा होता, तसा कलावादाच्या, आत्मकेंद्री आत्माविष्काराच्या, मानवी जीवनाची क्षुद्रता व्यक्त करणाऱ्या जंतुवादाच्या, व्यक्तिनिष्ठ आत्ममग्नतेच्या, खाजगी अनुभवांच्या आविष्काराची प्रतिष्ठा मानणारा, सिनिसिझमचा प्रभाव असलेला, निराशावादी मनोवस्थेला गोंजारणारा, साहित्याचा आणि सामाजिकतेचा काही संबंधही नाही, असे मानणारा होता.

अशा प्रेरणांनी साहित्यनिर्मिती करणारा वर्ग प्रामुख्याने समाजातील शहरवासी, ब्राह्मणी वर्ग होता. या काळातील या वर्गाची सामाजिक स्थिती नाजूक होती. गांधी खुनाचा मानसिक, सामाजिक प्रभाव पडून महाराष्ट्रात अनेक ब्राह्मणांची घरे जाळण्यात आली; त्याचा फार मोठा मानसिक धक्का या समाज-स्तराला बसला होता. लोकशाहीच्या प्रभावामुळे बहुजन समाजाकडे राजकीय सत्ता गेल्याने सरकारी नोकऱ्यांतील या वर्गाच्या स्थानाला धक्का बसला होता. महाराष्ट्र सरकारच्या नव्या सरकारी कूळ कायद्याचा परिणाम होऊन ग्रामीण विभागातील प्रामुख्याने या वर्गाची शेती त्याच्या हातून गेली होती. हा फार मोठा धक्का होता. १९६०साली आलेल्या नव्या शैक्षणिक धोरणामुळे खेड्यापाड्यात बहुजन समाजाने शिक्षणसंस्था स्थापन केल्याने परंपरेने चालत आलेली ज्ञानसत्ता, शिक्षणसत्ता या वर्गाच्या हातून निसटली होती. या सर्वांचा एकत्रित परिणाम मानसिक निराशावाद, जंतुवाद, आत्मकेंद्रितता, आत्ममग्नतेत, साहित्यातून आत्माावष्काराच्या नावे स्वत:ला गोंजारणे, आत्मताडण यात झालेला होता. त्यातून निर्माण होणारे साहित्य एकूण समाजाला काही देऊ



शकत नव्हते. ते फक्त त्या वर्गापुरते फिरत राहिले होते.

८) प्रस्थापित साहित्याच्या क्षेत्रात कलावादाचा वेडावाकडा किंवा एक विकृत परिणाम होऊन एका विपर्यस्त मत रूढ करण्याचा, रुजवण्याचा प्रयत्न काही मंडळींकडून होताना दिसतो. ही प्रस्थापित साहित्यिक मंडळी आहेत. (अ) 'साहित्यात जातीयवादी साहित्य येते आहे, सावधान!' असा इशारा त्यांनी दिलेला आहे. (ब) 'साहित्यात सामाजिक बांधिलकी मी मानत नाही, साहित्यात सामाजिकता वगैरे असे काही नसते.' असे ते मानतात. (क) 'साहित्य दलित, ग्रामीण, स्त्रीवादी असे काही प्रकार नसतात. साहित्य हे फक्त साहित्यच असते आणि ते चांगले किंवा वाईट असते. अशीही एक सबगोलंकार, भोंगळ भूमिका विपर्यस्त करून मांडली जाते.

समाजनिर्मितीला उपकारक, प्रेरक आणि उत्थानकारक साहित्यनिर्मिती समरसता मंचाला अभिप्रेत आहे. त्यामुळे अशा साहित्यातही आपोआपच भारतीय नवसमाजनिर्मितीची मूल्ये अभिप्रेत आहेत. ही मूल्ये महात्मा फुले, डॉ. आंबेडकर, संत गाडगेमहाराज, डॉ. हेडगेवार, गोळवळकर गुरुजी इत्यादी ज्या भारतीय संत-सुधारकांनी निर्मिली त्यांचीच प्रेरणा घेऊन महाराष्ट्रात यापूर्वी काही चळवळींनी आपआपल्या परीने साहित्यनिर्मिती केलेली आहे; त्यांचा तो खारीचा वाटाही या सेतुबंधनात उपयुक्त ठरेल, अशी माझी नम्र धारणा आहे. ■


## डॉ. आनंद यादव यांची ग्रंथसंपदा

| कादंबरी | | कथासंग्रह | |
|---|---|---|---|
| झोंबी | २००रु. | आदिताल | ६०रु. |
| नांगरणी | १००रु. | डवरणी | ६०रु. |
| घरभिंती | १८०रु. | खळाळ | ६०रु. |
| काचवेल | २००रु. | मातीखालची माती | ४०रु. |
| माऊली | ६०रु. | माळावरची मैना | ५५रु. |

**संदर्भ ग्रंथ**

| | |
|---|---|
| ग्रामीण साहित्य : स्वरूप व समस्या | ७०रु. |
| साहित्याची निर्मितीप्रक्रिया | ६५रु. |
| आत्मचरित्र मीमांसा | ९०रु. |
| मराठी लघुनिबंधाचा इतिहास | ७०रु. |

**पुणे येथे भरलेल्या ३३व्या अ. भा. मराठी विज्ञान संमेलनाचे अध्यक्ष डॉ. बाळ फोंडके यांच्या भाषणातील काही भाग**

## माहिती तंत्रज्ञान युगातील नवा समाज

आपण एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर आहोत. एका अनोख्या, लुभावणाऱ्या, पलीकडे एक आकर्षक जग आहे असं सूचित करणाऱ्या; परंतु बंद असलेल्या दरवाज्यासमोर आपण उभे आहोत. उघडला गेल्यानंतर कोणत्या परिसरात पाऊल टाकणार आहोत, त्या परिसराची वैशिष्ट्यं काय आहेत, याची तोंडओळख तरी करून घेण्याची वेळ येऊन ठेपली आहे.

आज मानवी समाज शतकाच्या अखेरीस येऊन ठेपला आहे. गेल्या शतकाच्या अखेरीस 'मानव समाज' हा शब्दप्रयोग न बिचकता करता यावा, अशी एकसंधता मानवी समाजात होती. गेल्या शंभर वर्षांच्या कालखंडात समाजरचना ढवळून निघाली असली, तरी मानवी समाजाचा एकत्रित विचार करणं त्यावेळीही शक्य होतं तसं ते आजही आहे; परंतु गेल्या सहस्रकाच्या अखेरीस मानवी समाज, तसा एकत्रित होता, की त्यावेळी मानवाच्या वेगवेगळ्या टोळ्या जगाच्या निरनिराळ्या भागात ठाण मांडून होत्या, याची नीटशी कल्पना करता येत नाही. मानवी समाजाच्या एकसंधतेचा विचार करणं आज आवश्यक आहे.

आजवर विखुरलेलं जग अधिकाधिक जवळ येत आहे. जागतिकीकरणाची प्रक्रिया अधिक स्पष्टपणे दिसून येत आहे. हा जो जागतिकीकरणाचा जोरदार प्रवाह वाहत आहे त्याला मूलतः माहिती तंत्रज्ञानात होत असलेली क्रांती कारणीभूत आहे. दूरसंचार क्षेत्रातल्या तंत्रज्ञानाच्या नवीन आविष्कारांची साथ त्याला लाभली आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या घोडदौडीचा प्रभाव जीवनाच्या सर्वच क्षेत्रात होईल, अशी स्पष्ट लक्षणं दिसत आहेत. म्हणूनच त्यांचा मागोवा घेऊन या तंत्रज्ञानाच्या प्रभावाखाली येत्या शतकात कोणती जीवनशैली अनुसरली जाणार आहे आणि त्याच्या अनुषंगानं कोणती समाजरचना अस्तित्वात येणार आहे, याचा वेध घेणं आवश्यक होऊन बसलं आहे.

**मराठी भाषेची शब्द निर्मिती क्षमता**

माहिती तंत्रज्ञानातील नव्या आविष्कारापायी दोन दूरगामी फेरबदल तर आजही होत असल्याचं दिसून येत आहे. सारं जग एका महाजाळ्यात गोवलं जात आहे. त्यामुळं पुढच्या शतकातला समाज हा या जाळ्यानं जोडलेला समाज, नेटवर्ल्ड सोसायटी असाच राहणार आहे. किंबहुना आविष्कारापोटी नेटवर्क हे एक नवं क्रियापद आणि नेटवर्किन्ग हे एक नवं नाम प्रचारात आलं आहे, प्रचलित झालं आहे. मराठी भाषा अस्तंगत होत आहे असा



आक्रोश आपण आजकाल बराच ऐकतो; परंतु विज्ञानातील प्रगतीपोटी ज्यांची गरज भासते अशा नव्या शब्दभांडाराची भर घालण्याचे काहीही प्रयत्न होताना दिसत नाहीत. इंग्रजी भाषेचं सामर्थ्य हेच आहे. अशा नवनवीन प्रक्रियांचं वर्णन करण्यासाठी समर्पक शब्दांची घडण करणं आणि ते शब्द सहजगत्या सामावून घेणं त्या भाषेनं आत्मसात केलं आहे. मराठी भाषेला काळाच्या गरजेनुसार नवनवीन वळणं देऊन ती समृद्ध करणं आवश्यक आहे. निदान विज्ञानाच्या क्षेत्रात अशा प्रकारचा प्रकल्प मराठी विज्ञान परिषदेनं हाती घेणं अत्यावश्यक आहे.

**नेटवर्कशी जोडणे आवश्यक**

माहिती तंत्रज्ञानातील प्रगतीचा जो प्रभाव समाज जीवनावर पडणार आहे, त्याचे महत्त्वाचे घटक तीन आहेत. एक प्रत्येक व्यक्तीला नेटवर्कच्या जाळ्याशी जोडून घेण्याचा मूलभूत हक्क प्रदान करणं. दुसरा हे साध्य होण्यासाठी दूरसंचार यंत्रणेत योग्य त्या सुधारणा करणं आणि तिसरा या जाळ्याच्या क्षमतेचा अधिकाधिक उपयोग करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या साधनांची निर्मिती करणं. यापैकी जाळ्याशी जोडून घेण्याच्या मूलभूत हक्काचेही विविध पैलू आहेत. या धरतीवरच्या प्रत्येक व्यक्तीला म्हणजेच कोणालाही या महाजाळ्याचा एक घटक होण्याची व्यवस्था करणं हा त्याचा सहज दृग्गोच्चर होणारा पैलू झाला. पण हा पैलू प्रत्यक्षात आणावयाचा असेल, तर त्याच्या इतर पैलूंकडेही तेवढंच लक्ष देणं आवश्यक आहे. कोणालाही जर जाळ्याशी जोडलं जाणं शक्य होऊ द्यावयाचं असेल, तर ती व्यक्ती जगाच्या पाठीवर कुठंही असली, तरी ते शक्य व्हायला हवं. याचाच अर्थ असा की, जगातले दूरदूर असणारे प्रदेश या जाळ्याशी जोडले जायला हवेत. थोडक्यात, जगाच्या दुर्गम भागाचाही इतर साऱ्या जगाशी संपर्क साधला जायला हवा. तसंच हा संपर्क ठराविक काळापुरता मर्यादित न राहता तो सतत राखता आला पाहिजे. दुसऱ्या शब्दांमध्ये सांगायचं, तर कोणत्याही वेळी संपर्क करता यायला हवा. थोडक्यात ते जाळे दिवसाचे चोवीस तास आणि वर्षाचे तीनशे पासष्ट दिवस कार्यान्वित राहिले पाहिजे. असं झालं तर दूरदूर खेड्यात राहणारी किंवा समाजाच्या तळागाळातील व्यक्तीही या जाळ्याचा एक संपूर्ण अधिकार असलेला घटक बनेल.

दुसरे दोन पैलूही महत्त्वाचे आहेत. त्यानुसार प्रत्येक व्यक्तीला कोणतीही माहिती मिळण्याचा अधिकार द्यायलाच हवा. तसंच ती माहिती कोणत्याही स्वरूपातली असली, तरी ती मिळणं शक्य व्हायला हवं. कोणतीही माहिती मिळण्याचा हक्क प्राप्त होणं याचाच अर्थ असा होतो की, कोणतीही माहिती गुप्त राखली जाणार नाही. याचे फार व्यापक परिणाम आहेत. कारण काही वेळा राष्ट्रीय महत्त्वाच्या गुपिताचं पावित्र्य अबाधित राखण्याची आवश्यकता असते. तोही राष्ट्राचा आणि राष्ट्राच्या व्यवहाराचं नियंत्रण करणाऱ्यांचा मूलभूत हक्क असतो. या दोन हक्कांमध्ये जो संभाव्य संघर्ष निर्माण होऊ शकतो त्याचं निराकरण करण्याच्या दृष्टीनंही विचार करणं आवश्यक होऊन बसलं आहे.

या पैलूच्या मागण्या पुऱ्या करून जाळ्याशी जोडलं जाण्याचा हक्क जरी जगातील प्रत्येक व्यक्तीला कायदेशीररीत्या बहाल केला गेला, तरी तो प्रत्यक्षात आणता येणं जेव्हा शक्य होईल त्यानंतरच समाजाची नवी घडण अस्तित्त्वात येऊ शकेल. आज अशा प्रकारच्या जाळ्यात गोवलं जाण्यासाठी कोणत्याही राष्ट्रीय सीमारेषांचा अडथळा होत नसला तरी त्यासाठी आवश्यक असणाऱ्या मूलभूत सोयी-सुविधा जगाच्या पाठीवर सर्वत्र सारख्याच प्रमाणात उपलब्ध नाहीत. पायाभूत सेवांचा दर्जा जोवर सारखा होत नाही तोवर ही विषमता नाहीशी होणार नाही. शिक्षण, आरोग्य, पर्यावरण आणि कार्यसंस्कृती या चार मूलभूत क्षेत्रांच्या आजच्या ढाच्यात तसंच कार्यपद्धतीत काही दूरगामी बदल अपेक्षित आहेत. आर्थिक परिस्थितीत अनुभवाला येणारी विषमता सर्वांचेच लक्ष चटकन वेधून घेते. अक्षरश: पोटापाण्याचा प्रश्न असल्यामुळे सारं अवधान त्यावर केंद्रित व्हावं, हे साहजिकच आहे. शैक्षणिक विषमतेच्या अंगीच आर्थिक विषमतेला खतपाणी घालण्याचं सामर्थ्य आहे हे ध्यानात घेतलं तर ही विषमता प्रथम हटवली पाहिजे, याविषयी दुमत होणार नाही. नैसर्गिक प्रतिभेची वाटणी भौगोलिक, प्रशासकीय, आर्थिक किंवा राजकीय सीमारेषांनुसार होत नसते. या मानवनिर्मित सीमारेषांमुळे त्या प्रतिभेचा पूर्ण क्षमतेनं विकास होण्यात मात्र अनेक अडथळे उभे केले जातात. ते दूर केले गेले तर प्रतिभासंचयाचा लाभ पूर्ण क्षमतेनं कोणत्याही एका देशालाच नव्हे तर समग्र मानवजातीला होऊ शकेल.

प्रदूषण आणि पर्यावरण ऱ्हास ही आज मानवाला भेडसावणारी एक महत्त्वाची समस्या आहे. प्रदूषण संपूर्णतया मानवनिर्मित आहे. नेटवर्क्ड सोसायटीत घरबसल्या उत्पादक काम करता येणं शक्य होणार असल्यामुळं वाहतुकीच्या व्यवस्थेवर पडणारा बोजा कमी करता येईल. पर्यायानं इंधनाची बचत तर होईलच, पण प्रदूषणाला आळा बसून पर्यावरण अधिक सुरक्षित, अधिक आल्हाददायक होण्यात मदत होईल.

जेंव्हा जेंव्हा नवीन प्रणालीचा उदय होतो तेंव्हा तेंव्हा त्यातील भल्याबुऱ्या शक्यतांबद्दल भिती व्यक्त केली जाते. विज्ञान आणि त्यावर आधारलेलं तंत्रज्ञान हे नेहमीच निर्विकार असते. या तंत्रज्ञानाच्या अंगी माणसातलं हीनपण टाळून त्याच्यातल्या तेजाला झळाळी देण्याचं सामर्थ्य आहे. त्या सामर्थ्याचा पूरेपूर फायदा उठवण्याला पोषक मानसिकता तयार करण्यासाठी प्रयत्न करणं ही आजची गरज आहे.

## विज्ञानाविषयक काही उपयुक्त पुस्तके

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| विज्ञान आणि आपण | निरंजन घाटे | ३०रु. | जिज्ञासेतून विज्ञान | कविता भालेराव | २५रु. |
| खेळ आणि विज्ञान | निरंजन घाटे | ४०रु. | विज्ञान गमती | डॉ. अरुण मांडे | ४०रु. |
| वैज्ञानिक खेळणी | डी. एस. इटोकर | ४५रु. | विज्ञान जमती | डॉ. अरुण मांडे | ४५रु. |
| छंदातून विज्ञान | डी. एस. इटोकर | ६०रु. | माहितीचे महामार्ग | अनु. वैशाली जोशी | ७०रु. |



# साहित्य वार्ता

## मधुकाकांनी शून्यातून विश्व उभे केले : खा. विखे पाटील

"ज्येष्ठ प्रकाशक मधुकाका कुलकर्णी यांनी आपल्या कर्तबगारीने संघर्षमय जीवनात शून्यातून विश्व निर्माण केले आहे," अशी प्रशंसा खासदार बाळासाहेब विखे पाटील यांनी कुलकर्णी यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त आयोजिण्यात आलेल्या कार्यक्रमात केली. त्यांच्या हस्ते मधुकाकांचा सत्कार करण्यात आला. सौ. उषाताई कुलकर्णी, तसेच श्री. कुलकर्णी यांचे स्नेही दत्तोपंत जमदग्नी, प्रा. वा. ना. दांडेकर, डॉ. रा. चिं. ढेरे, कांताशेठ नेरूरकर, चिं. स. लाटकर यांचाही सत्कार झाला. 'लोकसत्ता'चे संपादक डॉ. अरुण टिकेकर यांनी लिहिलेल्या 'अस्वस्थ महाराष्ट्र' ग्रंथाच्या दोन खंडांचे प्रकाशन खा. विखे पाटील यांनी केले. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ डॉ. शरच्चंद्र गोखले होते.

खा. विखे पाटील म्हणाले, "मधुकाकांनी जीवनात अनेक चढ-उतार पाहिले. तथापि, त्यांनी गरिबीचा कधी तिरस्कार केला नाही वा ते प्रवाहपतितही झाले नाहीत. आपल्या कर्तृत्वाच्या बळावर त्यांनी प्रकाशन व्यवसायात यश मिळविले. त्यांनी आपल्या क्षेत्रात, साहित्यिकांत दबदबा निर्माण केला आहे."

डॉ. य. दि. फडके म्हणाले, "मधुकाका कुलकर्णी म्हणजे चालतेबोलते माहिती केंद्र आहे. साहित्य आणि प्रकाशनाच्या क्षेत्रातील सर्व ताज्या घडामोडींची त्यांना अतिशय चांगली माहिती असते." या ज्येष्ठ प्रकाशकाने अनेक लेखकांनी मदत केली असल्याचे डॉ. ह. वि. सरदेसाई यांनी सांगितले. "मराठी भाषा आणि साहित्य यांचा प्रसार झाला पाहिजे, असा ध्यास मधुकाकांना आहे," असे ज्येष्ठ पत्रकार माधव गडकरी यांनी सांगितले. डॉ. गोखले म्हणाले, "सामाजिक बांधिलकी असणारे लेखक शोधणे हे मधुकाकांचे वेगळे कसब आहे. त्यांनी अनेकांना लिहिते केले."

सत्काराला उत्तर देताना श्री. कुलकर्णी म्हणाले, "आजचे साहित्य विविधांगी आहे. पूर्वी महिलांविषयीचे प्रश्न लेखनातून फारसे मांडले जात नसत. आता ती परिस्थिती बदलली आहे, ही समाधानाची बाब आहे. वैचारिक साहित्याच्या प्रकाशनावर आमची मदार आहे." आ. रामदास फुटाणे यांनी स्वागत केले. उपेंद्र कुलकर्णी यांनी आभार मानले.

## साहित्य अकादमी समितीच्या निमंत्रकपदी भालचंद्र नेमाडे

साहित्य अकादमीच्या मराठी समितीचे निमंत्रक म्हणून ज्येष्ठ साहित्यिक भालचंद्र नेमाडे काम पाहत आहेत.

बडोदा येथील महाराज सयाजीराव गायकवाड विद्यापीठाच्या सहकार्याने 'मौखिक

व लोकवाङ्मय' या विषयावर जानेवारी महिन्यात दोन दिवसांचे चर्चासत्र आयोजित करण्यात येणार आहे.

अकादमीच्या सर्वसाधारण सभेचे सदस्य श्री. नेमाडे, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, डॉ. मधुकर वाकोडे यांच्याखेरीज नारायण सुर्वे, सतीश काळसेकर, वसंत पाटणकर, भास्कर चंदनशिव, दत्ता भगत, डॉ. सोमनाथ कोमारपंत व डॉ. सुषमा करोगल हे समितीचे सदस्य आहेत.

---

**इंदूरच्या चिंचाळकर गुरुजींना 'पु. ल. देशपांडे बहुरूपी सन्मान'**

येथील श्रीराम पुजारी प्रतिष्ठानच्या वतीने दर वर्षी 'पु. ल. देशपांडे बहुरूपी सन्मान' देण्यात येणार आहे. या उपक्रमाच्या प्रथम वर्षी इंदूरचे विष्णू चिंचाळकर गुरुजी यांची या पुरस्कारासाठी निवड झाली आहे.

पुजारी प्रतिष्ठानच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या नवीन उपक्रमाची माहिती श्रीराम पुजारी यांनी दिली. पु. ल. देशपांडे यांनी ८०व्या वर्षात पदार्पण केले. त्यांच्याविषयी वाटणारी कृतज्ञता म्हणून प्रतिष्ठानच्या वतीने पु. ल. च्या नावाने हा पुरस्कार देण्यात येणार आहे. पाच हजार एक रुपये, सन्मानचिन्ह व शाल असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. यापुढे दर वर्षी आठ नोव्हेंबर रोजी हा पुरस्कार जाहीर होईल. ज्यांनी कलाक्षेत्रात जीवनभर योगदान दिले अशा ज्येष्ठ कलावंतांना हा पुरस्कार देणार असल्याचे श्रीराम पुजारी यांनी सांगितले.

यंदा इंदूरच्या विष्णू चिंचाळकर गुरुजी यांची या पुरस्कारासाठी निवड केली आहे. चिंचाळकर गुरुजी हे सध्या बाबा आमटे यांच्या आनंदवन येथे आहेत.

---

**मराठी व इंग्रजी फलकांवर दगडफेक**

कर्नाटक राज्याच्या ४३व्या स्थापनादिनानिमित्त काढण्यात आलेल्या मिरवणुकीमधील काही कार्यकर्त्यांनी बेळगावच्या रविवार पेठेतील मराठी व इंग्रजी भाषेत लावलेल्या नामफलकावर किरकोळ स्वरूपाची दगडफेक करून या मिरवणुकीला गालबोट लावले. पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करून संघर्ष टाळला.

शासनाने राबवलेल्या विविध योजनांचे देखावे असलेले शोभिवंत असे सुमारे तीस ट्रक, ट्रॅक्टर यात सामील झाले होते. विभागीय आयुक्तांच्या कार्यालयामधून निघालेली शोभायात्रा राणी चन्नमा चौक, काकती वेस, शनिवार खुट, गणपत गल्ली, मारुती गल्ली, हुतात्मा चौक, किर्लोस्कर रोडमार्गे कॉलेज रोडवरून लिंगराज महाविद्यालय येथे विसर्जित झाली. ही शोभायात्रा गणपत गल्लीमधून रविवार पेठ या अडत व्यापारी पेठेत आल्यावर दगडफेकीची घटना घडली. परंतु पोलिस व मिरवणुकीमधील काही समंजस नागरिकांनी त्यांना पुढे नेले, त्यामुळे संघर्ष टळला. मराठी भाषक नागरिक शिस्तबद्ध आणि शहाणे आहेत, असे मत बेळगावचे जिल्हाधिकारी जी. व्ही. कोंगवाड यांनी व्यक्त केले.



**मुलांमध्ये पुस्तकांची गोडी निर्माण करा : अनंत पै**

मुलांच्या मनात आत्मसन्मान व शिक्षण आणि पुस्तकांबद्दलचे प्रेम लहानपणापासून रुजवण्याची गरज असल्याचे मत अमरचित्रकथामालिकेचे निर्मितीप्रमुख अनंत पै यांनी 'क्रॉसवर्ड' या पुस्तकांच्या दुकानातर्फे आयोजित कार्यक्रमात बोलताना व्यक्त केले. प्रश्नमंजुषा कार्यक्रमाला मुलांनी भरपूर प्रतिसाद दिला.

याप्रसंगी पंचरत्न मालिकेचे प्रकाशन केल्यानंतर दै. लोकसत्ताचे संपादक अरुण टिकेकर यांनी 'क्रॉसवर्ड' हे केवळ पुस्तकांचे दुकान न राहता एक संस्था बनेल, असा विश्वास व्यक्त केला. पुस्तके मांडण्यासाठी इथे भरपूर जागा असल्याबद्दलही त्यांनी आनंद व्यक्त केला.

---

**विषमतेविरुद्धची लढाई वर्णीय दृष्टीकोनातून लढवावी**

विषमतेविरुद्धची लढाई वर्गीय नव्हे, तर वर्णीय दृष्टिकोनातून लढविली, तरच यशस्वी होऊ शकेल, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक, विचारवंत बाबूराव बागूल यांनी 'वेध चळवळींचा' संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी केले.

विनायकराव पाटील अध्यक्षस्थानी होते. ज्येष्ठ विचारवंत प्रा. राम बापट प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. श्री. बागूल पुढे म्हणाले, "परकीय सत्ता, परकीय धर्म व परकीय विचार देशात आल्यानंतरच पुरोगामी चळवळी सुरू झाल्या. वेगळा विचार देणारे संत बहुजन समाजातून उदयास आले. याचाच अर्थ, तोपर्यंत समाजावर पगडा असलेला हिंदू धर्म नवा विचार देण्यास असमर्थ होता, हे सिद्ध होते. ज्याच्या ताब्यात हा धर्म होता व आहे, तो शूर तर नव्हतेच; पण विद्वानही नव्हते हेही सिद्ध झाले. कारण त्यांच्या ताब्यात देश असतानाच परकीय सत्ता येथे आल्या. या हिंदूंनी उत्पादनाची नवीन साधनेही कधी शोधली नाहीत. त्यांच्यामुळेच देशात आदिवासीपणा व मागसलेपणा टिकला. याउलट येथील कष्टकरी वर्ग पुरोगामी असल्याचे सिद्ध झाले. त्याने प्रत्येक नवीन तंत्रज्ञान आत्मसात केले. वर्णव्यवस्थेला विरोध करण्यासाठी हिंदू धर्माचा त्याग करणारा वर्गही कष्टकरीच होता; मात्र आज हा वर्ग हिंदुत्ववाद्यांच्या मागे जातो आहे, हे आपल्या चळवळीचे अपयश आहे. चळवळ यशस्वी करण्यासाठी, सम्यक परिवर्तनासाठी ईश्वरशाही, पुरुषशाही, भांडवलशाही, ब्राह्मणशाहीविरुद्ध एकत्रित लढा दिला पाहिजे. या देशातील समस्या वर्गव्यवस्थेशी नव्हे; तर वर्णव्यवस्थेशी निगडित आहे, हे ओळखून लढा उभारला पाहिजे. या लढ्यात सर्व जातींनी सहभागी झाले पाहिजे."

---

**संस्कृतीचे खरे वाहन कविता असते - मंगेश पाडगावकर**

लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त कविसंमेलन झाले. 'जो गाणे ऐकून थरारतो, तोच खरा माणूस होय. माणसाची अन्नाची गरज

भागल्यानंतर तो जिच्याकडे विशेष लक्ष पुरवितो तीच खरी संस्कृती असते आणि संस्कृतीचे खरे वाहन कविता असते,' असे भावपूर्ण उद्गार कविश्रेष्ठ मंगेश पाडगावकर यांनी काढले.

वय आणि सवय या म्हातारपणी टिकून राहणाऱ्या गोष्टी आहेत. लासलगावसारख्या ग्रामीण भागात कविता ऐकण्यासाठी एवढ्या प्रचंड प्रमाणात रसिक एकत्र येतात, हे दृश्य पाहून मी कवी म्हणून माझीच पाठ थोपटून घेतो, असे सांगून ते मिश्किलपणे म्हणाले की, आज लासलगावातील चार ते पाच हजार दूरदर्शन संच बिघडले आहेत की काय, असे मला क्षणभर श्रोतृवर्ग पाहून वाटले कार्यक्रमाचे संयोजक आमदार कल्यावराव पाटील व कवी प्रकाश होळकर यांचा गौरव केला.

नीलेश पाटील – ('मला ढगाने धाडीले आहे', 'टपाल थेंबांचे'), नितीन होळकर – ('लालूचे अभंग', 'अंधारात आज माझाच प्रकाश'), लक्ष्मीकांत तांबोळी – ('जगणं मरणं यातली कविता एक वाट असते'), महेश केळुसकर – ('झिनझिनाट' – मालवणी रचना), संतोष पवार – ('कविता मला भेटली'), सतीश पिंपळगावकर – ('घर जेव्हा व्याकुळले होते'), मधु साळुंखे – ('हवाई सुंदरी'), डॉ. विठ्ठल शिंदे – ('आता इथं कुणालाच सुखाचे दोन घास मिळत नाही'), नीरजा – ('ऐन मध्यावर पौर्णिमेचा चंद्र गेला'), निरंजन उजगरे – ('माकडवाला'), अशोक नायगावकर – ('शहाणपण'), नारायण कुलकर्णी कवठेकर – ('गाढवांच्या गर्दीत'), फ. मु. शिंदे – ('आई'), प्रकाश होळकर – ('ज्योतिबा'), संजय चौधरी – ('तुझ्या पावलांना फुफाट्याची मेहंदी') यांनी कविता सादर केल्या. मंगेश पाडगावकरांच्या 'उदास बोध जे जे होईल ते पाहावे', 'प्रेम म्हणजे प्रेम असतं', या कवितेने कवी संमेलनाचा समारोप झाला.

---

**कुठल्याही नाटकावर बंदी नसावी : भक्ती बर्वे**

"कुठल्याही नाटकावर बंदी नसावी, अशी माझ्यासह सर्वच रंगकर्मींची इच्छा आहे," असे अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षा भक्ती बर्वे इनामदार यांनी रंगभूमी दिनानिमित्त अखिल भारतीय नाट्य विद्यामंदिर समितीच्या सांगली शाखेतर्फे ज्येष्ठ अभिनेत्री व दिग्दर्शिका सुधा करमरकर यांना विष्णुदास भावे गौरवपदक प्रदान करताना म्हटले.

श्रीमती बर्वे म्हणाल्या, "नाटककार, नट, दिग्दर्शक यांच्याप्रमाणेच प्रेक्षक हा घटकही रंगभूमीसाठी महत्त्वाचा आहे. त्यामुळे एखादे नाटक स्वीकारायचे की नाही, हे प्रेक्षकांनी ठरवावे. आज एखाद्या नाटकावरील बंदी मान्य केली, तर उद्या कोणत्याही गोष्टीवर बंदी येऊ शकते."

श्रीमती करमरकर यांनी "उपस्थित मायबाप रसिक जनहो," अशी आपल्या भाषणाची सुरवात केली. त्या म्हणाल्या. "मला या अत्यंत सन्मानाच्या अशा पुरस्कारापर्यंत पोचवण्यात अनेक सहकारी, नातेवाईक व सवंगडी यांचा मोठा वाटा आहे. भावे गौरवपदक मिळणे हा माझ्या आयुष्यातील परमोच्च आनंदाचा क्षण आहे. मी शास्त्रज्ञ, प्राध्यापक अथवा सुग्रण गृहिणी कदाचित झाले असते; परंतु मी रंगभूमीवर आले. त्यामुळे मला ६४ कलांचा समुच्चय असलेल्या नाट्यकलेचा अनुभव घेता आला. मी नाट्यक्षेत्रात नसते, तर कदाचित जीवनात एकाकी ठरले असते. कलावंत आणि माणूस म्हणूनही एक समृद्ध जीवन मला जगता आले नसते. बालरंगभूमीचा विकास करता आला नसता."

---

**लासलगावचे प्रकाश होळकर यांना यंदाचा 'विशाखा' काव्य पुरस्कार**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातर्फे कविवर्य कुसुमाग्रज यांच्या गौरवाप्रीत्यर्थ दरवर्षी राज्यपातळीवर 'विशाखा काव्यसंग्रह' स्पर्धा घेतली जाते. गेल्या वर्षात प्रसिद्ध झालेल्या आणि पहिलेच प्रकाशन असलेल्या काव्यसंग्रहाचा या स्पर्धेसाठी विचार केला जातो. यंदाच्या स्पर्धेतील पारितोषिकाचे मानकरी प्रकाश होळकर यांच्या 'कोरडे नक्षत्र' या काव्यसंग्रहास प्रथम, नीलकंठ कदम यांच्या 'स्वत:च्या समजुतीकरिता' या काव्यसंग्रहास द्वितीय तर श्रीकांत देशमुखांच्या 'बळिवंत' या काव्यसंग्रहास तृतीय क्रमांकाचा पुरस्कार घोषित करण्यात आला आहे.

---

**महाराष्ट्र फाउंडेशन मराठी साहित्य पुरस्कार जाहीर**

महाराष्ट्र फाउंडेशन आणि केशव गोरे स्मारक ट्रस्टच्या वतीने महाराष्ट्र फाउंडेशन मराठी साहित्य पुरस्कार औरंगाबाद येथे ३० नोव्हेंबर रोजी जाहीर करण्यात आले.

| | |
|---|---|
| **ललित साहित्य गौरव पुरस्कार** | : (२लाख २५हजार रु.) विजय तेंडूलकर, |
| **वैचारिक साहित्य गौरव पुरस्कार** | : (२लाख रु.) डॉ. रा.भा. पाटणकर, |
| **दलित साहित्य गौरव पुरस्कार** | : (५०हजार रु. व मानचिन्ह) बाबुराव बागूल, |
| **प्रकाशन संस्था पुरस्कार** | : (१लाख रु.) साधना प्रकाशन, |
| **वैचारिक नियतकालिक पुरस्कार** | : (५०हजार रु. व मानचिन्ह) मराठी विज्ञान पत्रिका (संपा. रा. वि. सोवनी, मुंबई), पुरोगामी सत्यशोधक (संपा. बाबा आढाव, पुणे) |

**पाच ग्रंथ पुरस्कार (प्रत्येकी २५ हजार रु.)**

| | |
|---|---|
| **ललित ग्रंथ पुरस्कार** | : शुभ्रकाही जीवघेणे (अंबरीष मिश्र), कार्यरत (अनिल अवचट), |
| **वैचारिक ग्रंथ पुरस्कार** | : आंबेडकर (प्रा. नलिनी पंडित), साहित्य विवेक (प्रा. म. द. हातकणंगलेकर), |
| **अपारंपारिक विषयावरील सामाजिक लेखन पुरस्कार** | : विमुक्तायन (लक्ष्मण माने) |

# महाराष्ट्र राज्य ग्रंथ पुरस्कार

दिनांक २० नोव्हेंबर रोजी मुंबईत सांस्कतिक खात्याचे मंत्री प्रमोद नवलकर यांनी १९९७-९८ मधील ग्रंथपुरस्कारांची घोषणा केली. पुरस्कारप्राप्त पुस्तकांची नावे पुढे देत आहोत.

## १९९७-९८ चे पुरस्कार (प्रत्येकी दहा हजार रुपये)

**काव्य** - संबद्ध (अंजली कुलकर्णी), आज इसवी सन ताजे टवटवीत वगैरे (अशोक बागवे)
**नाटक** - या चांगल्या घरात असं झालंच कसं? (रंजन दारव्हेकर), देखणी बायको दुसऱ्याची (अशोक पाटोळे)
**कादंबरी** - तृप्ता (रेखा बैजल), उनसावली (नामदेव चं. कांबळे)
**लघुकथा** - कातरवेळ (सुधा नरवणे), शारदा संगीत (प्रा. प्रकाश ना. संत)
**ललित गद्य** - शुभ्रकाही जीवघेणे (अंबरीश मिश्र), जिगसॉ (रामदास भटकळ)
**एकांकिका** - तीन कामगार एकांकिका (पद्माकर पाटील)
**विनोद** - गणगौळण (फ. मु. शिंदे)
**चरित्र/आत्मचरित्र** - पावलापुढलं आभाळ (शरद श्री. अवचट), लोकराजा शाहू छत्रपती (डॉ. रमेश जाधव)
**समिक्षा** - पौराणिक नाटक : नवा अन्वयार्थ (अरुण प्रभुणे), प्राक्तनाचे वेध (एस. डी. इनामदार)
**इतिहास** - विदर्भाचा इतिहास (श. गो. कोलारकर व गो. प. पुरंदरे)
**भाषा-व्याकरण** - व्हाडी म्हणी आणि लोकधर्म (विठ्ठल वाघ)
**भौतिकशास्त्र व तंत्रविज्ञान** - एकविसावं शतक (निरंजन घाटे), फळबागांसाठी अल्पखर्ची तंत्रव्यवस्थापन (शिवाजीराव ठोंबरे)
**उत्तम अनुवादित** - फलज्योतिष : शास्त्र की अंधश्रद्धा? (यशोदा भागवत)
**उत्तम संपादित** - निवडक माणूस (विनय हर्डीकर, यशवंत सहस्त्रबुद्धे, रेखा इनामदार विभागून)
**संकीर्ण** - उकल (मो. ग. तपस्वी)
**ललित विज्ञान** - वैज्ञानिक दृष्टिकोन आणि आपण (सुधीर पानसे)
**तत्त्वज्ञान मानसशास्त्र** - ज्ञानेश्वर आणि कबीर (डॉ. कृ. ज्ञा. भिंगारकर), विचारवंतांचा ईश्वर (शरद बेडेकर)



## प्रथम प्रकाशन उपविभाग (प्रत्येकी ५हजार रुपये)

**काव्य** - रास आणि गोंडर (जगदीश कदम)
**कादंबरी** - फिलर (मंगेश विश्वासराव), प्रतिदिन (कृष्णचंद्र ज्ञाते)
**कथा** - न पिकलेलं ऊन (प्रा. विश्वास कानडे)
**एकांकिका** - चौकार (गजेंद्र कोरे)
**उत्तम ललित गद्य** - झुंझरवेळ (आनंद अंतरकर)
**संपादित** - गंगाधर गाडगीळ : व्यक्ती आणि सृष्टी (प्रभा गणोरकर)


## दलित पददलितांवरील बाल वाङ्मय (प्रत्येकी ५ हजार रुपये)

**कविता** - जांभूळ बेट (सुरेश सावंत), पिल्लू (प्रवीण दवणे), छोट्या गोष्टी,
**बालकादंबरिका** - वडगावचा शिवा (धर्मराज माहुलकर), गाण्याचे कडवे (विजय पाडळकर)
**चरित्रे** - शिक्षण महर्षी डॉ. बापुजी साळुंखे (ल. ब. महामने), राष्ट्रसंत तुकडोजी (राजेंद्र दुर्योधन मुंढे)
**सर्वसामान्य ज्ञान छंद व शास्त्रे** - महिमा सणांचा (गणेश ल. केळकर), सर्पांची अजब दुनिया (मंदाकिनी गोगटे)
**नाटक** - गाढव विकणे आहे (विनय उपासनी)
**एकांकिका** - सूर्य पळाला आणि इतर एकांकिका (प्रियंवदा करंडे)

## विशेष पुरस्कार (प्रत्येकी दोन हजार रुपये)

**काव्य** - विलंबित (सतीश काळसेकर)
**कादंबरी** - आत्मजा (मधुवंती सप्रे)
**लघुकथा** - सारांश (शुभांगी भडभडे)
**ललित गद्य** - रंग अनंग (प्रकाश कामतीकर)
**एकांकिका** - बुद्ध (फ. मु. शिंदे)
**विनोद** - शंभर धागे प्रेमाचे (भा. ल. महाबळ)
**चरित्र आत्मचरित्र** - डॉ. खानखोजे : (वीणा गवाणकर)
**समीक्षा सौंदर्यशास्त्र** - निरंजनाचे माहेर (यशवंत पाठक)
**इतिहास इ.** - झुंज क्रांतिवीरांची (सुधाकर पाटील)
**तत्त्वज्ञान मानसशास्त्र** - भविष्यवेध (सविता जोशी)
**भाषाशास्त्र** - प्रशासनिक मराठी भाषेचा विकास (गीता भागवत)
**भौतिकशास्त्र तंत्रविज्ञान** - विसंगतीचे विज्ञान (डॉ. हेमंत विंझे)
**संकीर्ण** - नायिका (रेखा देशपांडे)

# पुस्तक परिचय




### मानवी उत्क्रांतीचा पुढला टप्पा शोधू पाहणाऱ्या विज्ञानकथा

## युगंधर

**निरंजन घाटे**

विज्ञानकथा हा विसाव्या शतकाच्या द्रष्टेपणाचा आविष्कार आहे. विज्ञानाच्या सहाय्याने माणसाला जे काही गवसते आहे त्याच्या मर्यादा दाखवून देणारा आणि जे काही अजून साध्य होऊ शकेल त्याबद्दलची कल्पनारम्य स्वप्ने चितारणारा हा वाङ्मयप्रकार एका परीने अनावर मानवी जिज्ञासेला चौखूर उधळण्याची हिंमत प्रदान करतो. ज्यूल व्हर्नने शंभर-सव्वाशे वर्षांपूर्वी चंद्रावर स्वारी करणारे अग्निबाण कादंबरीत चितारले. पृथ्वीच्या गाभ्याच्या आणि समुद्राच्या तळाचा शोध घेतला. उत्तर-दक्षिण ध्रुवावर साहसी संशोधकांना पाठवले. पाणबुडी आणि अवकाशयान यांच्या किमयांची वर्णने केली. जमीन, समुद्र आणि आकाश यात संचार करणारी वाहने कथांतून रंगवली. रेडिओ व दूरचित्रवाणी यांचे भाकित केले. ''ज्यूल व्हर्नच्या विज्ञानकथा बालपणी वाचल्या, आणि त्याने मांडलेल्या कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी यूरोप-अमेरिकेतले शास्त्रज्ञ गेले शतकभर प्रयोगशाळांमध्ये प्रयोग करीत राहिले'' असे म्हटले जाते. केवळ कल्पनांचे मनोरे म्हणून विज्ञानकथांकडे एक भाकड प्रकार म्हणून पाहणे म्हणूनच गैर आहे.

मराठीत विज्ञानकथाकार मोजकेच आहेत; विज्ञान आणि कथा या दोहोंची सांगड घालण्याची किमयाही तशी दुराराध्य आहे. पाश्चात्य विज्ञानकथांचा आधार घेऊनच बरेचसे लेखन होत असावे. परंतु त्याकडे अजूनही गंभीरपणे पाहिले जात नाही.

निरंजन घाटे यांनी 'युगंधर' या आपल्या तीन दीर्घ विज्ञानकथांच्या संग्रहाच्या



मनोगतात मराठी संपादक, प्रकाशक विज्ञानकथेकडे दुय्यम लेखन म्हणून कसे पाहत याबद्दलचा स्वानुभव दिला आहे. जयंत नारळीकर यांच्या विज्ञानकथेला १९७४मध्ये पुरस्कार मिळाल्यावर संपादकांचा दृष्टिकोन बदलला. परंतु त्याआधीपासून घाटे विज्ञानकथा लिहित होते. संपादकांच्या आग्रहामुळे त्या मोजक्या शब्दांच्या व बेतशीर लांबीच्या असत. विज्ञानकथांकडे बहुतेक प्रकाशक बालवाङ्मय म्हणून बघत.

'युगंधर' या पुस्तकात निरंजन घाटे यांच्या तीन दीर्घकथा आहेत. त्यापैकी 'रामचे आगमन'ही जगद्विख्यात विज्ञानकथाकार आर्थर सी क्लार्क यांच्या 'रँदेव्ह्यू विथ राम' या कादंबरीवर आधारित आहे.

मच्छर ही आणीबाणीच्या काळात लिहिलेली कथा. सर्वंकष हुकुमशाहीच्या विरोधात पत्रके वाटणे, पोलिसयंत्रणेला त्रस्त करणे, जुलमी राज्यकर्त्यांना ठार मारणे, सरकारी यंत्रणा उद्ध्वस्त करणे, विद्रोहासाठी लोकमत जागृत व संघटित करणे – या दृष्टीने प्रयत्न करणाऱ्या व्याधमुक्ती संघटनेचा प्रमुख विक्रमादित्य मौर्य याची कहाणी ही कथा सांगते.

'मच्छर' बनून हा विक्रम पृथ्वीवरून हुकुमशाही राजवट असणाऱ्या व्याध साम्राज्यातील जेमेक या ग्रहावर जाऊन तेथील सत्तेविरुद्ध संघर्ष उभा करतो. 'मच्छर' बनून गुणगुण करून शत्रूपक्षाला भंडावून सोडायचे' हे त्याचे उद्दिष्ट. त्यासाठी भाडोत्री मारेकरी, वेषान्तर, वगैरे मार्गही लीलया चोखाळतो. गुप्त पोलिसांचा ससेमिरा चुकवण्यासाठी नाना युक्त्या वापरतो. ''जे आज युद्धासाठी दुसऱ्यांचे बळी देत आहेत ते लौकरच फासावर जातील,'' यासारखी पत्रके जागोजाग तो लावतो. ''प्रथम अंतर्गत विरोधाचा आभास निर्माण करणे व शत्रूच्या मनावर त्याची सत्यता ठसवणे, शत्रूच्या मनात भीती निर्माण करणे, ह्या भीतीपोटी शत्रूला प्रतिरोध करायला प्रवृत्त करणे, शत्रूच्या हालचालीत अडथळे निर्माण करून त्याचा उपमर्द करणे, लोकांत ह्या बातम्या पसरविणे, शत्रूवर हल्ले चढवून, तिच्या प्रचारयंत्रणेचा खोटेपणा लोकांपुढे आणणे, अफवा पसरवणे, सरकारबद्दलची चीड जनमानसात वाढवत राहणे अशी काही सूत्रे विक्रमच्या या मोहिमेच्या मूळाशी असतात. विक्रम आपल्या या मोहिमेत अखेर यश मिळवतो. त्या यशामुळे त्याला सांगण्यात येते, ''तुझ्याचसारखा एकजण अल्बांगवर होता. त्याच्याकडून गेल्या महिन्याभरात रिपोर्ट नाही. बहुधा पकडला गेला असावा. त्याच्या जागी तुला जायचंय.'' परग्रहावरचा उल्लेख यापलीकडे या कथेत विज्ञान फारसे येत नाही.

'युगंधर' या कथेत अनेक गुंतागुंतीच्या कल्पना आहेत; आणि त्यामुळे वाचकांना आपल्या एकाग्रतेची चरणसीमा गाठावी लागेल. कुठे, का, कशासाठी कोण काय करतोय हे सगळे निरंजन घाटे अशा काही चलाखीने सांगतात की सामान्य वाचकाची मती गुंग व्हावी. विज्ञानविषयक काही कल्पना त्यात आहेत. पण कथा थोडक्यात सांगायची म्हणून

अनेक बाबींचा नीट उलगडा करण्यात ते स्वत:ला गुंतवत नाहीत.

सदाशिव विष्णू फातरपेकर नामक व्यक्ती संकटात सापडते; संकट कसले? तर या सदाशिव विष्णूच्या शरीरात त्याचे वडील विष्णू लक्ष्मण यांचे डीएनए रेणू हयात होते; त्यांचे गुणदुर्गुण सर्व त्याच्यात उतरले होते. दोन वर्षांच्या अंतरिक्ष मोहिमेवर निघालेल्या अवकाश यानातच विष्णू लक्ष्मण व जोआन वांग चू या दोघांचे प्रेम जडते. तेथेच त्यांचे लग्न होते आणि अवकाशयानातच सदाशिव विष्णूचा जन्म होतो. सदाशिवचे संगोपन एका यंत्रमानवाकडे सोपवण्यात येते. सदाशिव विष्णू 'सरकारी पालकत्वा'खाली वाढत राहतो. त्या मोहिमेतून आईवडील परत येण्याची शक्यता कमी होती. त्यामुळे सदाशिवची तहहयात देखभाल करण्याची जबाबदारी सरकारवरच पडते. पहिली दहा वर्षे तो 'ग्लोरी' या अवकाश यानामध्ये काढतो. त्याच्यात काही अतींद्रिय शक्ती आढळून येतात. अवकाशउडीच्या वेळी त्याच्या अपरिपक्व मेंदूतील काही अणुरेणूंना पुनर्जुळणीत नवी सामर्थ्ये प्राप्त होतात.

*निरंजन घाटे देवेन कौशिक या नावानेही लेखन करतात. या कथेत त्यांनी पुढील वाक्य टाकले आहे तेही लक्षात घेण्याजोगे आहे. "अखेरीस विचार म्हणजे तरी काय? मानवी मेंदूत निर्माण होणारे विद्युत प्रवाह. जेव्हा दिक्कालाच्या मिती ताणल्या जातात किंवा बदलल्या जातात तेव्हा या प्रक्षेपणात चांगले वाईट होण्याची शक्यता देवेन कौशिक या शास्त्रज्ञाने बोलून दाखवली होती. पण त्याच्याकडे कुणी लक्ष दिलं नव्हतं." (१०२)*

सदाशिव विष्णू आपल्या अतींद्रिय सामर्थ्याचा पहिला प्रयोग 'ग्लोरी' यानाच्या कमांडरलाच दाखवतो. हॉटेलात गेल्यावर टेबलावरचा ग्लास तो जागेवरून न उठता मनोबलानं त्यांच्यापर्यंत सरकवतो. 'भडव्या, पुन्हा असं केलंस तर गळा दाबून जीव घेईन' असे ते बजावतात. नंतर शिवी दिली म्हणून त्याची क्षमा मागतात. दहा वर्षे वय असतानाच कमांडर बाबा त्याला एका ग्रहावर नेतात. तो व्यवस्थित राहतो. सोळाव्या वर्षी मित्र नावाच्या ताऱ्याभोवती यान असताना सदाशिव विष्णूला धोक्याची जाणीव होते. पृथ्वीवर राहण्याची परवानगी कमांडर बाबा मिळवतात. पृथ्वीवर येण्याच्या मार्गावर मित्रा ग्रहाभोवती मुक्काम करावा लागतो. तेथे सदाशिव विष्णू आपल्या अतींद्रिय शक्तींचा वापर करू पाहतो. एका उपाहारगृहात आपल्यासारखीच शक्ती असणारी व्यक्ती तेथे आहे आणि एक फाटका तरुण एका वेट्रेसच्या मनातले विचार जाणून घेत तिच्या विचारावर ताबा मिळवत आहे असे त्याला मनोमन जाणवते. त्या तरुणीला वाचवण्याचे विचार त्याच्या मनात येतात. "खरा मर्द असशील तर तुल्यबळ माणसाशी लढ. आपल्या शक्तीचा वापर स्वार्थासाठी न करता दुसऱ्याला सुखी करण्यासाठी कर." असे त्याच्या मनावर कमांडरबाबांनी बिंबवलेले असते.

तो तरुण सदाशिव विष्णूला हाक मारतो. आपले नाव जॉन स्मिथ असून, या ग्रहावर प्रथमच येणाऱ्यांनी ग्रहाची माहिती देणे, प्रेक्षणीय स्थळे दाखवणे, सुखसोयी पुरवणे, ही कामे आपण करतो असे सांगतो. तो त्याला प्लेझर पार्कमध्ये नेऊन एका तरुणीशी त्याची गाठ



घालून देण्याची तयारी दाखवतो. 'आपल्या ताकदीनं आपलं संरक्षण करून जमलं तर जॉन स्मिथला धडा शिकवावा' या हेतूने सदाशिव विष्णू त्या प्रकरणाकडे पहात असतो. त्या ग्रहावरचे लेफ्टनंट सुगिआर्तो अतींद्रिय शक्ती असणाऱ्या मुलांच्या शोधात असतात; ते सदाशिव विष्णूवर लक्ष ठेवतात. सदाशिव विष्णू हॉटेलातील वेट्रेस युजिनी हिला बरोबर घेऊन जॉन स्मिथ, सुगिआर्तो व युजिनी यांची मने विद्युत प्रवाह बंद पडल्याप्रमाणे क्षणात रिकामी करते. युजिनी त्याच्या बाहुपाशात शिरते. "मी इथं कशी" असा प्रश्न ती विचारते. युजिनी त्याच्याबरोबर प्लेझर पार्कमध्ये गमतीजमती करते. निरनिराळे खेळ ते दोघे खेळतात. युजिनी पंचविशीतली; तर तो सोयी वर्षांचा. तिला तो आवडतो. तिच्यातलं वात्सल्य आणि स्त्रीत्व जागं होतं. प्लेझर हंटमध्ये दोघे शिरतात. नंतर तो रात्री अवकाशतळावर जातो. युजिनीला ग्लोरीवर नोकरी देण्याचे कमांडर बाबा ठरवतात.

पृथ्वीवर आल्यावर सदाशिव विष्णूला युजिनीची आठवण होत राहते. त्याच्या आयुष्यात आलेली ती पहिली स्त्री! युजिनीही तिकडे ग्लोरी अवकाशयानावर बेचैन असते. तो अतींद्रिय शक्तीने तिच्यापर्यंत पोचतो. तिला पृथ्वीवर आणण्याची योजना आखून कमांडरबाबांना त्याविषयी माहिती देतो. आपल्या मानसिक शक्तीचा विकास करून मानवजातीचे कल्याण साधायचे असे तो ठरवतो, आणि आपल्या मित्रांना अंमली पदार्थ घातलेले पेय देऊन त्यांच्या मनातले विचार तपासून घेऊ लागतो. त्यावेळी पृथ्वीवरची लोकसंख्या वीस लाखावर आलेली होती; त्यापैकी दोन लाख लोकांमध्ये सदाशिव विष्णूच्या शक्तिमान विचारशलाकेपुढे टिकण्याएवढे सामर्थ्यशाली मनच अस्तित्वात नव्हते. पृथ्वीवरील बहुतेक मानव मेंदू कापल्याने गुलामासारखे राबत होते.

सदाशिव विष्णू मानसिक शक्तींचा विकास झालेल्या मुलांचा शोध घेऊन त्यांना एका प्रचंड तळघरात आणून त्यांच्यातील अतींद्रिय शक्ती वाढवण्याचे प्रयोग करू लागतो.

युजिनीला तो पृथ्वीवर बोलावून घेतो आणि तिला आपले पूर्ववृत्त सांगतो. त्या तळघरातील मुले तिला दाखवून म्हणतो, "ही तुझी मुलं. यांची तू आई. उद्याचे हे आधारस्तंभ आहेत." सदाशिव विष्णू तेथील राज्यकर्त्यांना बजावतो. "तुम्ही नालायक आहात. तुमच्या स्वार्थासाठी तुम्ही संबंध मानवजातीला गुलाम केले आहे. हे अत्याचार थांबायला हवेत." राज्यकर्ते त्याला पकडू पाहतात. पण तो निसटून जातो. युद्धाशिवाय गत्यंतर नाही हे त्याच्या लक्षात येते.

आपले कार्य संपल्यावर सदाशिव विष्णू युजिनीसह एका अज्ञात ग्रहप्रदेशाकडे निघून जातो. त्याच्या मानसिक शक्ती वाढत जातात. अपर अवकाशात जाऊन आपले प्रकाशमय अणुरेणू मानवी साम्राज्यात विखरून द्यायचे – ते जागोजाग रुजून त्यातून सदाशिव विष्णूसारखी कणखर मनं तयार होतील, मानवी मनातला अंधार दूर होऊन परकीय आक्रमणाचा प्रतिकार केला जाईल." "सर्वत्र प्रकाश फैलावू दे." हा सदाशिव विष्णूचा

अखेरचा आदेश.

**रामचे आगमन**

इ. स. २१३१साली मंगळावर बसवलेली रडारयंत्रणा दिवसाला दहाबारा उल्कांचा पत्ता लावत असते. स्पेसगार्डचे संगणक त्याच्या कक्षांची गणिते मांडत होते. त्या यांत्रिक मेंदूत अशा पाचसहा लाख अशनींची माहिती नोंदवलेली असते. त्यापैकी फक्त पाचच अशनी २०० किमीपेक्षा अधिक व्यास असणाऱ्या होत्या; त्याच वर्षी सापडलेली ३१/४३९ ही उल्का गुरूच्याही पलीकडे असते आणि तिचा व्यास ४० किमीपेक्षा जास्त असतो, तिच्या भ्रमणकक्षेचा अंदाज आल्यावर शास्त्रज्ञ बुचकळ्यात पडतात. ती भ्रमणकथा लंबवर्तुळाकार नव्हती. तिचा वेगही इतका प्रचंड होता की सूर्याचे गुरुत्वाकर्षणही तिला अडवू शकत नव्हते. सूर्याच्या खुंटाला वळसा घालून ती आपल्या गतीने अज्ञाताचा प्रवास करीत राहणार होती. गेल्या शंभर वर्षात इतकी मोठी उल्का पृथ्वीच्या दिशेने फिरकली नव्हती. या उल्केला राम हे नाव देण्यात आले. रामाचा प्रकाशकीय आलेख मिळत नव्हता. रामावर पहारा करणाऱ्या डॉ. विल्यम स्टेटन यांनी अवकाशस्थ दुर्बिणीतून पाहणी केली तेव्हा रामला स्वत:भोवती गिरकी घेण्यास ४ मिनिटेच लागत होती असे आढळले. विषुववृत्तावर त्याच्या भ्रमणाचा वेग ताशी हजार किलोमीटरपेक्षाही जास्त होता. याचा अर्थ त्यावर वैश्विक धूळ बसणे शक्य नव्हते. स्वत:च्याच वेगाने तो अजून फुटला कसा नाही – याचे त्यांना आश्चर्य वाटले. डॉ. स्टेंटन यांना रामाची विचित्र वागणूक आश्चर्यकारक वाटली. राम हा एक विझलेला सूर्य तर नसावा ना अशी शंका त्यांना आली.

कमांडर नॉर्टन यांचे एनडीव्हर हे अवकाशयान 'मिशन राम' मोहिमेवर निघून रामच्या उत्तर ध्रुवावर उतरण्याचा प्रयत्न करते. रामची निर्मिती प्रतिद्रव्यापासून झालेली असेल तर एनडीव्हर आणि राम यांचा संपर्क येताच प्रचंड स्फोट होऊन ग्रहमालेला काही काळ दुसरा सूर्य मिळण्याची शक्यता होती. परंतु तेथे उत्तरध्रुवाच्या मध्यभागी असणाऱ्या नळकांड्याच्या अक्षावरील १०० मीटर व्यासाच्या चकतीवर उतरणे त्यामानाने सुरक्षित असते.

राम अशनीची सूर्यमाला कुठली, त्याचे वय काय असावे याबद्दल मग तर्कवितर्क सुरू होतात. राम गेल्या दोन लक्ष वर्षात कुठल्याही सूर्याजवळून गेलेला नाही; त्यावर जीवावशेष किंवा सूक्ष्मजीवही नाहीत. लेफ्टनंट कमांडर मर्सर रामवर प्रत्यक्ष उतरून माहिती मिळवतात. तेथील हवा त्यांना थोडी दमट व कुबट वाटते.

रामच्या अंतर्भागातले तापमान हळूहळू वाढतेय, ते गोठणबिंदूच्या वर चालले आहे. तेव्हा हवा प्रसरण पावेल आणि प्रचंड वादळे निर्माण होतील अशी माहिती डॉ. परेश दतात. राम हा ग्रह मृत नसावा, तेथे सजीव जीव नसले तरी संरक्षणयोजना नक्कीच असेल, चुकीच्या पद्धतीने धोकानिदर्शक यंत्रणा हाताळली तर घोटाळा होईल अशी भीतीही त्यांनी व्यक्त केली. रामचे इंधन आणि भ्रमणकारक द्रव्य हे वेगळेच आहे. स्पेस ड्राइव्ह अवकाश तरंगाची (रॉकेटचे तत्त्व न वापरणारी चालक शक्ती) कल्पना त्यात वापरलेली असेल समुद्राच्या दोन भिंतीतल्या उंचीचा फरक लक्षात घेतला तर रामची गतिधारण शक्ती शोधून काढता येईल असे डॉ. परेश सुचवतात.

कमांडर नॉर्टन यांना पृथ्वीवरून कमांडर इन चीफचा संदेश येतो, ''बुधावरून अतिवेगवान अवकाशयान रामकडे निघाले आहे. ते रामच्या दिशेने ३२२व्या दिवशी पोचेल. त्याआधी निघायची तयारी हवी.'' आज ३१५वा दिवस असतो. रामवरून उड्डाणाची तयारी नॉर्टन सुरू करतात. बुधाचे अस्त्र रामपासून ५० किमीवर येऊन थांबते. ते अस्त्र म्हणजे ५०० ते १००० मेगॅटन फ्युजन बाँब असून रामच्या कवचावर फुटले तर रामच्या ठिकऱ्या उडतील. तेव्हा ''त्यापासून १०००० किमी दूर व्हा.'' असा संदेश नॉर्टनला मिळतो.


बुधाच्या प्रतिनिधीकडून या अस्त्राबद्दल अधिक माहिती देण्यात येते, ''रामने आपला वेग आणि स्वपरिभ्रमण कमी केले आहे. सूर्यमालेला त्यामुळे धोका संभवतो. समूळ उच्छेद करणे आवश्यक वाटते. रामला नष्ट करणे हा गुन्हा आहे. पण स्वसंरक्षणासाठी तसे करणे भाग आहे. या बाँबचा स्फोट मात्र कमांडर नॉर्टन यांना पूर्वसूचना देऊनच करण्यात येईल.''

कमांडर नॉर्टनला बोरिस रॉडरिगो सांगतो की मी हा बाँब डिफ्युज करू शकेन. बुधावरून आदेश आल्याशिवाय हा बाँब फुटणे शक्य नाही. त्यावर सुरक्षा साधनं असणारच. रॉकेट स्कूटरवरून बोरिस त्या बाँबचे कॅमेरे चुकवून बाँबच्या अँटेनापर्यंत मजल मारतो. दहा मीटर लांबी, तीन मीटर व्यास या आकाराचा तो बाँब यानाच्या अक्षाला काटकोनात बसवल्याने हातोड्यासारखा दिसत असतो. संदेशवाहन करणारी तार तोडली की बाँब डिफ्युज होईल अशी अटकळ बांधून बोरिस काम सुरू करतो. पण तेवढ्यात बाँब थरथरू लागतो. त्याच्या बुडाकडून निळी ज्योत चमकू लागते. ''रामपासून दहा हजार किमी तरी दूर जा'' असा संदेश बुधाकडून नॉर्टनला येतो. पण बोरिस त्या बाँबच्या तारा तोडून टाकतो. बाँबवाहक रॉकेट रामपासून दूर जाऊ लागते. राम सूर्यात शिरतो तेव्हा तो नष्ट होणार असे सर्वांना वाटते. पण सूर्याकडून ऊर्जा मिळवून तो दुसऱ्या बाजूने बाहेर पडतो. त्याला बाँबने उडवण्याची कल्पना खुळेपणाची ठरते. राम आकाशगंगेबाहेर पडतो.

डॉ. परेरा म्हणतात की रामने आपल्या मानवी बुद्धिमत्तेच्या मर्यादांची पुन्हा जाणीव करून दिली. आपल्या शास्त्रज्ञांच्या मर्यादा दाखवल्या. माणसाला धडा शिकवला.

या कथांमधील विज्ञान, फँटसी, आणि आदर्शवाद विस्तारभयाच्या दडपणाने खरे म्हणजे व्यवस्थित प्रकट होतोच असे नाही. निवेदनातही धूसरता राहते. परदेशी विज्ञानकथांचे विपुल वाचन असणाऱ्या घाटे यांनी मराठीत या प्रकाराला वैभवाचे दिवस दाखवावे अशी अपेक्षा आहे.

***युगंधर, पृष्ठे १६५, शंभर रुपये***




**भारतीयांच्या नाकर्तेपणाचे परदेशात होणारे लज्जास्पद प्रदर्शन**

# भारत विकणे आहे

**मूळ लेखक : चित्रा सुब्रह्मण्यम्**
**अनुवाद : वि. स. वाळिंबे**

चित्रा सुब्रह्मण्यम् यांनी बोफोर्स प्रकरणाबाबत जिनिव्हाहून पाठवलेल्या बातम्यांमुळे भारतातच नव्हे तर जगभर खळबळ माजली. गेली दहा पंधरा वर्षे त्या आंतरराष्ट्रीय घटनांवर भाष्य करीत आहेत; आणि परदेशात जे भारतीय मंत्री आणि अधिकारी जातात त्यांच्याशी संपर्क ठेवून, त्यांच्या तेथील एकूण प्रभावाचीही चिकित्सा करीत आहेत. त्यांच्या वार्तापत्रांना त्यामुळे मोठा वाचकवर्ग लाभलेला आहे. भारताची आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील प्रतिमा फारशी अभिमानास्पद नाही; आणि आपले एकूण जे आर्थिक व्यवहार होतात तेही काही सरळ-स्वच्छ नसतात. भारतात अनेक गोष्टी आपण गृहीत धरून चालतो; परंतु परदेशात थोडेफार वास्तव्य झाले तर त्या गोष्टी आपल्याला खटकू लागतात. आपल्या देशातील अनेक गोष्टींची परदेशी लोकांना स्पष्टीकरणे देताना आपली दमछाक होते. परदेशीयांच्या काही साध्या साध्या प्रश्नांची उत्तरे देतानाही आपला गोंधळ उडतो. चित्रा सुब्रह्मण्यम् याबाबतच्या अडचणीची कल्पना स्पष्ट करण्यासाठी काही बाबींकडे लक्ष वेधतात. उदाहरणार्थ, भारताची लोकसंख्या युरोपच्या चौपट आहे. स्वीडन आणि पोर्तुगाल या दोन युरोपीय देशांत जेवढा फरक आढळतो तेवढाच तो उत्तर व दक्षिण भारतात आढळतो. भारताचे दरमाणशी उत्पन्न २६० डॉलर्स असे म्हटले की हा गरीब देश ठरतो. परंतु भारतातील ९२ कोटी लोकसंख्येतील एक टक्का लोक अत्यंत श्रीमंत आहेत; ही संख्या स्वित्झर्लंड आणि स्वीडन यांच्या एकूण लोकसंख्येच्या दीडपट आहे; २० कोटी लोक सुखवस्तू मध्यमवर्गीय आहेत. इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स यांची लोकसंख्या तेवढीच आहे. हे ऐकले की ऐकणारा चकित होणारच! भारत स्वत:चे उपग्रह करू शकतो, अणुबाँबचा स्फोट करतो. परंतु त्यामुळे तो विकसित देशांमध्ये गणला जातो का? नाही. अशा अनेक



विरोधाभासांचा प्रत्यय भारतात येतो. देवापुढे १०८ मोदक ठेवून मनासारखे काम होऊ दे असा नवस एकीकडे करताना दुसरीकडे वीज-फोन-नगरसेवक-कोपऱ्यातला पोलीस यांना पैसे चारले की आपले काम नक्की होणार हेही आपल्याला माहीत असते.

एक देश म्हणून ताठ मानेने उभे राहण्याऐवजी आपण सर्वत्र लाचारासारखे वागतो याची चित्रा सुब्रह्मण्यम् यांना चीड येते.

भारत विकणे आहे हे त्यांच्या 'इंडिया इज फॉर सेल' या पुस्तकाचे भाषांतर आहे. काश्मीर वाचवा, क्रांतीच्या शोधात माननीय मंत्रीजी, (दूरसंचार खात्यातील गडबड गोंधळ आणि मंत्र्यांचे अज्ञान), जेव्हा डाव्होस झोपले होते (नरसिंहराव डाव्होस येथे जागतिक आर्थिक मंत्र्याच्या बैठकीला गेले होते तेव्हा त्यांनी सुरक्षिततेसाठी केलेल्या अवास्तव मागण्यांची हकीकत), भारत कॅलिफोर्नियाकडून बदाम का विकत घेतो? (भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारातील आत्मघातकी सौदे), इंटेलेक्टवरसिंग पेपरवाला (परदेशी परिसंवादात व व्यासपीठावर भाषणबाजी गाजवणारे आपले विचारवंत), जागतिकीकरण (उदारीपणाचा अंगीकार करूनही कमी न झालेली भारतीय गरीबी), शासकीय अशासकीय संघटना (दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा बट्ट्याबोळ करणाऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदा व त्यांना जाणारे प्रतिनिधी) - असे नऊ लेख या पुस्तकात आहेत. या लेखांचा बाज बराचसा वृत्तपत्रीय आहे. त्यात फारशी सुसूत्रता आहे असेही नाही. अगदी नवीन माहितीही विशेष आहे असे नाही, परंतु आंतरराष्ट्रीय दृष्टिकोनातून हे सर्व तपशील टिपलेले आहेत; त्यामुळे त्यांना विशेष अर्थपूर्णता लाभली आहे. चित्रा सुब्रह्मण्यम् उपरोधपूर्ण लेखनाद्वारे या तपशीलांची दाहकता अधिक प्रखर करू शकल्या असत्या; परंतु शैलीदार लेखनाकडे त्यांचे लक्ष नसावे. त्यामुळे वास्तवतेचे वाभाडे काढण्यावरच त्या खूष आहेत. आपण भारतीय लोकच आजच्या भारतीय दुरवस्थेला जबाबदार आहोत असा चित्रा सुब्रह्मण्यम् यांच्या एकदंर प्रतिपादनाचा रोख आहे. आपल्या राजकारण्यांच्या, अधिकारीवर्गाच्या आणि बुद्धिवंतांच्या वागण्यातील विसंगती आणि संधिसाधूपणा यावर त्यांचा रोख आहे.

भारताचे प्रतिनिधित्व आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर करण्यासाठी जे लोक जातात ते तेथे आपल्या अज्ञानाने कसे हास्यास्पद ठरतात याचे अनेक किस्से चित्रा सुब्रह्मण्यम् यांच्या पत्रकारितेच्या दप्तरी दाखल आहेत. त्यातले काही खचितच मासलेवाईक आहेत. डाव्होस येथे परदेशी गुंतवणूकदारांशी वाटाघाटी करण्यासाठी पंतप्रधान नरसिंहराव गेले; तेथे ते चक्क झोप काढत राहिले. झेड सिक्युरिटीच्या नावाखाली आपल्या मार्गावरची संपूर्ण वाहतूक रोखण्याची मागणी त्यांनी केली. डाव्होसच्या स्विस पोलिसांनी ती साफ धुडकावून लावली. डाव्होसला व्यापारी, उद्योगपती, राज्यकर्ते, अधिकारी येतात ते व्यावहारिक सौदे करण्यासाठी. व्यापारवृद्धीसाठी! बड्या व्यापाऱ्यांच्या या परिषदेला हजर राहण्यासाठी दरवर्षी १५ हजार डॉलर्स वर्गणी व आठ हजार डॉलर्स परिषद फी द्यावी लागते. परंतु आपले

जे भारतीय प्रतिनिधी तेथे जातात ते पुरेशी तयारी करून जात नाहीत. आपल्या अडाणीपणाचे, पाश्चात्य चालीरीतीबद्दलच्या तसेच शिष्टाचारांबद्दलच्या अनभिज्ञतेचे प्रदर्शन तेथे सर्रास केले जाते. आपल्या खोट्या प्रतिष्ठेची टिमकी तेथे मिरवली जाते; त्यामुळे जाणकारांच्यात आपले हसे होते; असे चित्रा सुब्रह्मण्यम् अनेकानेक उदाहरणाद्वारे दाखवत राहतात. आपले हित आपल्याला कळत नाही, आपल्याला आपली बाजू नीट मांडता येत नाही; आपले मंत्री नीट इंग्रजी बोलू शकत नाहीत; परदेशात जाऊन आपली भूमिका नीट मांडण्यासाठी धडपडण्याऐवजी स्वत:चीच खरेदी किंवा इतर मौजमजा करण्यात आपले मंत्री वेळ घालवतात. १९९५साली टेलेकॉम सोहळयाला आपले जे मंत्री गेले त्यांच्या घरी वर्षभराने ९७ लाख डॉलर्स सापडले. ''याला त्या सगळ्या बहुराष्ट्रीय कंपन्या जबाबदार आहेत'' असे त्यांनी साळसूदपणे म्हटले.


अण्वस्त्र स्फोटानंतर भारत आंतरराष्ट्रीय स्तरावर एकाकी पडला. भारतावर पाश्चात्य राष्ट्रांनी व जपानने आर्थिक निर्बंध लादले. युरुग्वे येथील कापड निर्यातीबाबतच्या वाटाघाटीत भारताने आपली बाजू नीट २५० लाख कोटी डॉलर्सची ही बाजारपेठ इ.स. २००३ पर्यंत पाश्चात्य राष्ट्रांच्या वर्चस्वाखाली राहणे क्रमप्राप्त ठरले. भारतातल्या औषधांच्या किंमतीतही वाढ झाली आणि शेती, फळे, जैववैज्ञानिक प्रक्रिया या संबंधात पेटंट घेण्याचीही त्यामुळे पाळी आली भारताची एकूण आर्थिक दृष्ट्या गळचेपी करण्याला येथील वाटाघाटींची दिशा कारणीभूत ठरली. परंतु आपले प्रतिनिधी गाफील राहिले.

सीटीबीटी (सार्वत्रिक अण्वस्त्र बंदी करार)वर सह्या करण्याचा आग्रह अमेरिका भारताला करत आहे. त्यावर सह्या केल्याने खरोखर काय होणार आहे? पाच अण्वस्त्रधारी देशांत हा करार झालेला असूनही त्या देशांच्या अण्वस्त्र चाचण्या चालूच आहेत. गेल्या ५० वर्षात अमेरिकेने अण्वस्त्रावर ४० हजार कोटी डॉलर्स (१६०० हजार कोटी रुपये) खर्च केले आहेत. अमेरिकेची नवी प्रगत अस्त्रे इ.स. २००२ सालापर्यंत तयार होतील त्यासाठी १००कोटी डॉलर्स खर्चून प्रयोगशाळा उभारण्यात आली आहे. १९९७मध्ये अण्वस्त्रांवरील खर्चात अमेरिकेने २३ कोटी डॉलर्सची वाढ केली आहे. फ्रान्सही येत्या ५ वर्षात १३० कोटी डॉलर्स अण्वस्त्रावर खर्च करणार आहे. चीनने तिबेटमधील डोंगराळ भागात ५०० मैल लांबीचा कालवा खोदून शांततामय उपयोगासाठी अणुस्फोट करण्याची तयारी चालवली आहे. म्हणजे हे अण्वस्त्रधारी देश आपापले अण्वस्त्रनिर्मितीचे उद्दिष्ट पुढे रेटतच आहेत. भारतावर मात्र निर्बंध घालत आहेत. हा दुटप्पीपणा एका लेखात दाखवला आहे.

कोणाही जागरूक भारतीय विचारवंताला हे पुस्तक वाचल्यावर भारतीय राजकारण्यांवर व परदेशात वरचेवर शिष्टमंडळांतून जाणाऱ्या अधिकाऱ्यांवर जोरदार हल्ला चढवण्याची सुरसुरी येईल-इतका स्फोटक मालमसाला चित्रा सुब्रह्मण्यम् यांनी यात ठासून भरला आहे.

***भारत विकणे आहे, पृष्ठे १६८, शंभर रुपये***





**शिवाजी सावंत यांच्या ठेवणीतल्या सुवर्णाच्या लहानमोठ्या चीजा**

# कांचनकण

**शिवाजी सावंत**

मृत्युंजयकार शिवाजी सावंत आपलं साहित्य म्हणजे सुवर्ण मानतात. मृत्युंजयच्या वजनाएवढं सोनं त्यांना खचितच प्राप्त झालं असणार. त्यामुळे आपले छोटेमोठे ललित लेख म्हणजेही सुवर्णाचे कण अशी त्यांची रास्त भावना आहे. साहजिकच आपल्या ललित लेखांच्या संग्रहाला त्यांनी 'कांचनकण' असे नाव द्यावे यात नवल नाही. ''सोने नरम असते. कलाकुसरपूर्ण अलंकार घडवताना शंभरी नंबरी सोन्यात तांब्यासारख्या सर्वसमावेशक अन्य टिकाऊ धातू वापरावा लागतो. कथा, कादंबरी, नाटक, काव्य - अशा सर्वच वाङ्मयप्रकारात लेखकाला आपल्या चिंतनाचं आणि अनुभवाचं सार - तांबं - थोडंफार घालावंच लागतं. नाहीतर तो 'वाङ्मयीन अलंकार' वाचकाला रुचणार नाही'' असे सावंत स्पष्ट करतात. ललितलेखाचा आकृतिबंध हा देखील त्यामानाने विमुक्त आहे, आणि हा शंभर नंबरी झगझगीत डाग आहे असा त्यांचा दावा आहे. चिंतनाचं-अनुभवाचं तांबं त्यात नाही असा समज मात्र करून घ्यायचे कारण नाही. उपमा वगैरे अलंकारातलं साम्य फार ताणायचं नसतं. शिवाजी सावंत ललितलेखांकडे कुठल्या भावनेनं पाहतात हे महत्त्वाचं.

या 'कांचनकणा'मध्ये अकरा ऐवजांचा खजिना आहे. त्यात छत्रपती शिवराय आणि थोरले बाजीराव पेशवे यांच्याप्रमाणे आचार्य अत्रे, गीतरामायणकार ग. दि. माडगूळकर, संगीतकार वसंत देसाई, साखर सम्राट विखेपाटील, गोदी कामगार नेते भाई मनोहर कोतवाल यांच्याशी संबंधित आठवणी व लेखही आहेत. 'कलावंतनगरी कोल्हापूर'मध्ये करवीरच्या इतिहासाबरोबर तेथील मान्यवर व्यक्तींचेही गुणगान झालेले आहे.

ज्ञानेश्वरांवरील दोन लेखांत ज्ञानेश्वर यांच्या ठायी असणाऱ्या 'खट्याळ मुलाच्या दुडक्या चालीत भेटणाऱ्या जबऱ्या नाटककाराचीच मोहिनी' सावंतांवर पडल्याचे दिसते.

ज्ञानेश्वरांनी विश्वाचं आर्त आपल्या मनात प्रकाशलेलं अनुभवलं आणि अमृतानुभव, भावार्थदीपिका यात शब्दरूपानं प्रकट केलं; "विश्वाचं आर्त म्हणून काही वास्तव आहे याची जाण त्यांनी म्हाटमोळ्या रांगड्या भावमनाला प्रथम दिली." यात ज्ञानदेवांचं श्रेयस आहे असं सावंत लक्षात आणून देतात. "विश्वाचं आर्त प्रत्यक्ष प्रकाशू शकतं या गारूड वाटणाऱ्या सत्याचं ज्ञानोबांनी इये मराठीचिये नगरीत स्वहस्ते बीजारोपण केलं. ज्ञानोबांच्या या विचार मोगऱ्याचा वेलू पुढील प्रत्येक शतकात गगनावेरी गेला, मराठी मुलुखभर पसरला."

'मृत्युंजय' : दूरदर्शनचे दुर्दर्शन' या लेखात मृत्युंजय दूरदर्शनवर दाखवण्याच्या निमित्ताने घडलेले मंडी हाऊसच्या नोकरशाहीच्या लाल फितीचे, आणि ही मालिका सिद्ध करणाऱ्या डॉ. चंद्रप्रकाश द्विवेदी प्रभृतींच्या हलगर्जीपणाचे निरनिराळे उद्विग्न करणारे किस्से दिले आहेत. ८७ भागांत सादर करण्याचा प्रस्ताव असूनही केवळ १३ भागांत ही मालिका सादर करण्याची परवानगी मंडीहाऊसने दिली; तेव्हा सावंतांनी मराठी खासदारांना एक निवेदनपत्र पाठवून संसदेत प्रश्न विचारण्यास प्रवृत्त केले. प्रसारणमंत्री के. पी. सिंगदेव यांनी दूरदर्शनच्या महासंचालकांना बोलावून त्याबद्दल विचारले; आणि म्हटले, "ह्या कृतीची गळचेपी करू नका. तुम्हाला किती पैसे पाहिजेत? ते मी माझ्या पर्समधून देतो." हे संभाषण खा. धर्माण्णा सादुल यांच्या उपस्थितीत झाले. १९९०मध्ये हा प्रस्ताव दूरदर्शनकडे गेला, चार हजार प्रस्तावांतून निवडलेल्या २९ प्रस्तावांमध्ये मृत्युंजयचा क्रम सहावा होता. 'ए प्लस ग्रेड' आणि राष्ट्रीय प्रसारणात रविवारची वेळ त्यासाठी देण्यात आली. निर्माते होते मुरली मनोहर सिंग आणि दिग्दर्शक होते बुनियाद फेम ज्योतिस्वरूप. संगीत कल्याणजी आनंदजी, पार्श्वगायक अनुप जलोटा, कला दिग्दर्शक चाणक्य फेम नीतीश रॉय – अशी अगदी खास मंडळी असूनही मालिका १९९७पर्यंत रखडली. सादर झाली ती अत्यंत दयनीय अवस्थेत आणि नंतरही अर्ध्यात बंद पडली. सावंतांचे मानधनही बरेच बुडाले. त्यासाठी कोर्टकचेऱ्याही झाल्या.

गोदी कामगार नेते मनोहर कोतवाल यांचे चरित्र सावंतांनी लिहिले आहे. त्याचीच एक रूपरेखा 'गोदीच्या किनाऱ्यावर' या ३२ पृष्ठांच्या लेखात आली आहे. १९४२च्या आंदोलनकाळात कोतवालांनी इंजिनियर लिमये यांनी तयार केलेल्या बाँबचा बॅलार्ड पियरवरील ब्रिटिश जहाजावर स्फोट करण्याची योजना आखली. तसा तो बाँब बोटीवर ठेवलाही. पण त्याचा स्फोटच झाला नाही. टाइम्स ऑफ इंडिया दैनिकाच्या गुदामात मात्र बाँबचा स्फोट झाला पण त्या गुदामाचे फारसे नुकसान झाले नाही. दादर स्टेशनजवळच्या पाम व्ह्यू या इमारतीत कोतवालांना राह्यला जागा मिळाली. तेथे गणपतराव कर्णिकांच्या कुटुंबालाही त्यांनी बडोद्याहून आणून ठेवले. राज्य कर्मचारी संघटनेचे आर. जी. कर्णिक हे त्या गणपतरावांचे चिरंजीव. टी बोर्डात नोकरी करीत कामगार संघटनेतील नेतृत्वाकडे कोतवालांची वाटचाल वेगाने होत गेली. कोल्हापूर संस्थानच्या बिघडलेल्या मुदपाकखान्याची



अर्थव्यवस्था नीट लावण्यासाठी कोतवालांना बोलविण्यात आले. त्या भटारखान्याला त्यांनी आठ दिवसात शिस्त लावली. १९४४ मध्ये मुंबई गोदीत प्रचंड बाँबस्फोट झाला. पी डिमेलोंच्या नेतृत्वाखाली गोदी कामगारांचा यशस्वी संप झाला. पुढे कोतवालांनी पुण्यात वर्षभर राहून खडकीच्या ॲम्युनिशन फॅक्टरीत टीबोर्डाचे सुसज्ज कँटिन सुरू केले. जयप्रकाश नारायण व डॉ. लोहिया यांच्या व्याख्यानांनी प्रभावित होऊन, गांधी–टॉलस्टॉय–कार्ल मार्क्स यांचे ग्रंथ वाचून कोतवालाची टी बोर्डाची नोकरी सोडून कामगार चवळवळीला वाहून घेण्याचे ठरवले. (१९४७). प्रॉव्हिडंट फंडाचे पैसे घेऊन एक छापखाना सुरू केला. ऑइल मजदूर संघाच्या कामगारांची बैठक घेऊन सिल्व्हर टाऊन कंपनीत संप पुकारला. दोन महिने संप झाला. तो पूर्ण अयशस्वी ठरला. कामगार एकेक करून कामावर गेले. त्या संपाच्या अपयशाने कोतवालांना अंतर्मुख केले. बीपीटी रेल्वेमेन्स युनियनचे सरचिटणीसपद त्यांजकडे त्या संघाचे अध्यक्ष दिनकरराव देसाई यांनी सोपवले. कामगार नेते ना. म. जोशी हेही त्या संघाचे आधारस्तंभ होते. जयप्रकाशजींनी समाजवादी विचारसरणीच्या अनुरोधाने हिंद मजदूर सभा ही कामगार संघटना २५ डिसेंबर १९४८ रोजी स्थापन केली. कोतवालांनी त्या संघटनेचे काम करण्याचे ठरवले. आज अखेर ते चालू आहे. एवढे हे प्रकरण सावंतांनी या पुस्तकात अंतर्भूत केले आहे.

मृत्युंजयच्या संदर्भात आचार्य अत्रे, ग. दि. माडगूळकर आणि वसंत देसाई यांनी आशीर्वाद दिले, त्यावरचा तीन पृष्ठांचा कृतज्ञतापूर्ण लेख सावंतांच्या अंतरंगातील कृतार्थभावाची साक्ष पटवतो. आचार्य अत्रे यांनी १९६९च्या मार्चमध्ये मृत्युंजयवरील एका कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले होते. ९जूनला सावंतांचा कोल्हापूरला विवाह झाला. त्यांना आशीर्वादपर पत्र आचार्य अत्रे यांनी रुग्णालयात जाण्यापूर्वी लिहून घेऊन त्यावर सही करून पाठवले. १३ जून १९६९ रोजी आचार्य अत्रे यांचे प्राणोत्क्रमण झाले. मृत्यूपूर्वी सही केलेलं त्याचं ते शेवटचं पत्र. ग. दि. माडगूळकर यांनी अनंतराव कुलकर्णी यांच्या घरी मृत्युंजयच्या पहिल्या प्रतीचे पूजन केले. १९७५मध्ये 'अशी मने असे नमुने' या पुस्तकाचे प्रकाशनही केले. गदिमांच्या हस्ते झालेला तो प्रकाशन समारंभ शेवटचाच ठरला. संगीतकार वसंत देसाई यांनी १९७५मध्ये मृत्युंजय नाटकाचं आपल्या वास्तूत आधी पूजन करून सर्वांना पेढे वाटले. "छे छे! तुम्ही कवी. तुम्ही नाही नमस्कार करायचा" म्हणत त्यांनी सावंतांना मिठीत घेतले. या नाटकाचे शंभरावर प्रयोग झाले. पण वसंतराव देसाई लिफ्टच्या अपघातात अचानक गेले आणि त्यांना त्याचा प्रयोग बघायलाच मिळाला नाही. हे सगळे चमत्कारिक योगायोग; सावंताना अनमोल आशीर्वादपर वाटतात!

हे लेख वेगवेगळ्या पातळीवरचे, वेगवेगळ्या धाटणीचे आहेत. त्यांची सरमिसळ काही वेळा खटकतेही. पण एका वेळी एकच लेख वाचण्याचे पथ्य ठेवले तर सावंतांच्या मनाशी अधिक संवाद साधता येईल. साहित्याबद्दलची त्यांची आत्मीय भावना अत्यंत

जातिवंत आहे.

"साहित्यातील एक अलिखित शाश्वत सिद्धान्तसत्य सदैव ध्यानी ठेवलं पाहिजे. शब्दाला जसा विशेष असा ठरीव अर्थ असतो तसाच तो शब्द कुणी उच्चारलाय वा लिहिलाय यालाही सघन अर्थ प्राप्त होतो. ज्ञानेश्वर, समर्थ रामदास यासारखे महानुभाव संत महाकवी शब्दाला हवं तसं बोलायला लावतात... साहित्य, मग ते कोणतंही असो, रचनाकाराचा अचूक मनोवेध घ्यायचा असेल तर, तर असे मूलभूत, सत्य व सत्यशोधक प्रश्न उठवूनच आस्वादलं पाहिजे. तरच काहीतरी जाणीव पोषक असं रसमय हाताशी लागतं. साहित्य आस्वादणं म्हणजे नुसतं शब्द चिवडणं नव्हे. मोतीकंठ्यातील प्रत्येक मोत्यात राम आहे का हे तो मोती दातळून बघणाऱ्या हनुमंताचं मन आणि दृष्टी त्यासाठी आवश्यक आहे." असे सावंत मानतात. ज्ञानेश्वरी हा अशा दृष्टीनं आस्वादत जायचा एक अक्षर काव्यग्रंथ आहे असे ते सुचवतात. हे शब्दाला हवं तसं बोलतं करण्याचं अजब सामर्थ्य ज्ञानोबांपासून तुकोबांपर्यंत संतकवीत ठायी ठायी आढळतं.

"ज्ञानेश्वरी हे तर अर्थश्रीमंत ओव्यांच्या इक्षुदंडांचं शिवारच आहे" (४०), "अशी क्षणचित्रांची लोभसवाणी नाट्यंच नाट्यं ज्ञानेश्वरीत पावलापावलांवर, आपली सौंदर्यरंगत कलात्मक ढंगांत प्रकटवत भेटत जातात." (३५), "नादगंधरंग यांचे अस्सल शैलीदार प्रकटन हे रचनाकाराच्या ठायी ऊर्जेची सहज उचंबळ असल्याशिवाय कधीच होत नाही. अभिजात कालजयी अक्षर साहित्याचे ते व्यवच्छेदक लक्षणच आहे." अशा अलंकारपूर्ण पल्लेदार वाक्यरचनांची सावंतांना मोठीच आवडी आहे. आणि "ज्ञानेश्वर सर्व कवींचे शब्दशः दादा आहेत." सारख्या साध्या वाक्यांचीही ते अधूनमधून पखरण करीत आपले सव्यसाचीपण लीलया दाखवतात. अशा शब्दांच्या मोहक जाळ्यात वाचक सहजगत्या गुंतत गेला, आणि त्यात त्याला सुवर्णकणांची झळाळीही दिसत राहिली तर त्यात आश्चर्य ते काय?


***कांचनकण, पृष्ठे ११५, सत्तर रुपये***


## पालकांसाठी खुषखबर!

*खास मुलांसाठी आम्ही **एक आकर्षक सवलत योजना** जाहीर करीत आहोत. आपण ऑगस्ट महिन्यापासून १० महिने दरमहा २० रु. पाठवा. आपल्या मुलांसाठी मे १९९९मध्ये ३०० रुपयांची आपल्या पसंतीची पुस्तके आम्ही आमच्या खर्चाने पाठवू. त्वरा करा. या योजनेचे सभासद व्हा व मुलांसाठी मे महिन्यात छान छान भरपूर पुस्तके घरपोच मिळवा.*

*आमचा पत्ता : **मेहता मराठी ग्रंथजगत,** १२१६, सदाशिव पेठ,*
*पुणे ४११०३०.*




**सामाजिक समस्यांवर**
**कल्पकतापूर्ण फँटसीद्वारे**
**केलेला नाट्यपूर्ण प्रहार**

# सातव्या मुलीची सातवी मुलगी

**अशोक पाटोळे**

'सातव्या मुलीची सातवी मुलगी' असे सहज लक्षात राहणारे नाव आहे अशोक पाटोळे यांच्या विनोदी कथासंग्रहाचे! रंगभूमी, चित्रपट व दूरदर्शन या सर्व माध्यमात झळकणारे अशोक पाटोळे हे नाव 'आवाज'च्या विनोदी दिवाळी अंकात वाचून प्रथम वाचकांच्या अवधानाचे केंद्र झालेले आहे. त्यांच्या आठ कथांचे संकलन प्रथमच पुस्तकरूपाने इतक्या दीर्घ कालावधीनंतर यावे याचे त्यामुळे काहीसे आश्चर्यच वाटते. १९६८साली त्यांची पहिली विनोदी कथा ('प्यार करना शीक रे') मार्मिकमध्ये प्रसिद्ध झाली. त्यानंतर तब्बल तीस वर्षांनी हा त्यांचा पहिला कथासंग्रह बाहेर पडत आहे हा विलंब हे आपल्या साहित्यक्षेत्रातल्या एकूण अनास्थेचेच लक्षण मानायला हवे. आपला हा पहिलावहिला कथासंग्रह कदाचित शेवटचाच ठरेल असे प्रास्ताविकाच्या पहिल्याच वाक्यात सांगून पाटोळे वाचकांना थोडा धक्काही देतात! "हा संग्रह निघण्याचा सर्वात मोठा फायदा म्हणजे आवाजचे दिवाळी अंक आता जपून ठेवायला नकोत." यासारख्या विधानानेही पाटोळे यांच्या विनोदीबुद्धीची साक्ष पटावी. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांचे सुदाम्याचे पोहे कॉलेजात असताना पाटोळे यांनी पुन:पुन्हा सेवन केले (तरीही त्यांचे बाळकडू त्यांना मिळाले असे ते म्हणतात!) हरी ओम होम हरी व जरा अदबीने बोला या दोन कथांवर श्रीपाद कृष्णांची छाप आहे; विनोदाचा वापर सामाजिक प्रश्न मांडण्यासाठी करण्याचे ते श्री.कृ. कोल्हटकर स्टाइल डेमॉन्स्ट्रेशन आहे असे पाटोळे मानतात.

श्रीपाद कृष्णांच्याच बरोबर पु.ल. देशपांडे यांच्या बटाटाच्या चाळीने आणि खोगीरभरतीने १९६८ सालापासून अशोक पाटोळे यांच्या अंगात शिरकाव केला; अंमलदारने त्यात आणखी खोलवर मुसंडी मारली. परिणाम : घरी येऊन लगेच लिहिलेली पहिली

विनोदी कथा. नाव : प्यार करना शीक रे. पुलंच्या कथा म्हणजे नवोदित विनोदकाराचं गाइड अशी कबुली पाटोळे दिलखुलासपणे देतात. पण पुलंनी सर्वच मराठी विनोदी लेखकांना खुजं करून ठेवलंय आणि या जन्मात आपल्याला तशी उंची गाठणं जमणार नाही अशी पाटोळे यांची भावना आहे. (सर्वच मराठी विनोदकारांना पुनर्जन्म अतृप्त आशा ठेवून इहलोक सोडायला लावून घेण्याची सोय करून ठेवल्याबद्दल पुलंना वाढीव श्रेय द्यायला हवे!). पुलंच्या आत्मलक्षी शैलीचा आदर्श पाटोळे यांनी समोर ठेवला आहे असा त्यांचाच कबुलीजबाब आहे.

पाटोळे यांच्या सर्वच कथा तशा विस्तृत आहेत. पंचवीस-तीस पृष्ठांच्या. त्यात कल्पना चमत्कृतीही भरपूर आहे. आपल्या चेटूकविद्येचे समर्थन करून एका फाजील आत्मविश्वास असणाऱ्या पत्रकाराला धडा शिकवणारी चेटकीण 'सातव्या मुलीची सातवी मुलगी' या कथेत भेटते.

'दखल' साप्ताहिकात "आपला 'बुवा' असा आहे" हा स्तंभ लिहिणाऱ्या दिलीप श्यामसुंदर या पत्रकाराला त्याची बायको कल्पिता एक पत्र देते." "पेडर रोडवर कैलास निवासमध्ये सातव्या मजल्यावरच्या सात नंबरच्या फ्लॅटमध्ये एक चेटकीण राहते. तिचे नाव अनसूया जगदंबे. तिला भेटून आपल्या स्तंभात तिच्यावर लिहावे." अशी सूचना कल्पिता करते. 'पेडर रोडची चेटकीण' असा विषय जाहीर करून हा स्तंभलेखक त्या चेटकिणीच्या भेटीला जातो. 'चेटकीण' म्हणून एक सुंदर गोल चेहऱ्याची, सलवार कुर्ता घातलेली स्मित हास्य करणारी जपानी बाहुलीसारखी नाजूक तरुणी पुढे येते, तेव्हा सोफ्यावरून घसरण्याचेच काय ते त्या पत्रकाराचे बाकी राहते. "तुम्ही चेटकीण आहात यावर विश्वासच बसत नाही; चेटकीण म्हणजे अक्राळविक्राळ चेहरा, पिंजारलेले केस, कपाळावर मळवट, लांबलचक नखांची थेरडी असं चित्र उभं राहतं." असं पत्रकार म्हणतो तेव्हा अनसूया म्हणते, "ते वर्णन माझ्या आईचं." आपण सातव्या मुलीची सातवी मुलगी असून सर्वार्थाने चेटकीण आहोत अशी खात्री ती देते. वाटेल त्या बाईला चेटकीण होता येत नाही. ही शक्ती फक्त सात मुली असलेल्या चेटकिणीच्या सातव्या मुलीमध्येच येऊ शकते. माझ्या आईला दहा वर्षापूर्वी गावकऱ्यांनी दगडांनी चेचून मारलं मी तिची सातवी मुलगी, म्हणून ही विद्या माझ्यात उपजतच आलेली आहे असे स्पष्टीकरणही ती देते. "हा माझा पिढीजात व्यवसाय आहे." म्हणून ती पत्रकाराची फिरकी घेते. "आपल्याला कळत नसलेल्या विषयावर बोलायचा तुम्हांला अधिकारच आहे." "माझ्या व्यवसायाबद्दल वाईट बोललात तर तुम्हांला खाजगारीत्या त्याची फळं भोगावी लागतील" अशी धमकीही अनसूया देते. बरीच गरमागरम प्रश्नोत्तरे झाल्यावर पत्रकार दिलीप श्यामसुंदरला ती चक्क आव्हानच देते,' माझ्याविरुद्ध लिहिलंत तर तुम्हांला त्रासच त्रास होणार आहे."

पेडर रोडची चिकणी चेटकीण हा लेख आल्यावर अनेकांचे अभिनंदनाचे फोन



दिलीपला येतात. अनसूयेची त्याने खरपूस टर उडवलेली होती. दुसऱ्या दिवशी स्वतः अनसूयाच दिलीपच्या घरी येते. "हा विनोदी लेख नाही - ही टिंगल टवाळी आहे. तुम्ही आमच्या चेटूक विद्येची टिंगल केलीय, विटंबना केलीय. आता माझी एकटीची क्षमा मागून तुमची सुटका होणार नाही. समस्त मांत्रिकांची क्षमा दखलच्या पुढच्या अंकात मागा." दिलीप दिलगिरी व्यक्त करीन म्हणतो पण क्षमायाचना नाही म्हणतो. दिलीपची बायको चेटूकबिटूक थोतांड आहे - दिलगिरी नाही मागायची असं नवऱ्याला सांगते. तेव्हा अनसूया म्हणते, "तुमच्या डोक्यात मी काय म्हणतेय ते शिरत नाही तर-" आणि ती पर्समधून मेणाचा गोळा काढते.

"माझी मेणाची बाहुली करणार वाटतं?" पत्रकार विचारतो.

"नाही. तुमच्याकरता वेगळीच योजना आहे. तुमचं आपल्या बायकोवर फार प्रेम आहे ना?"

अनसूया बघताबघता मेणाच्या गोळ्यापासून कल्पिताचा तोंडवळा असलेली बाहुली बनवते. ती आपल्या पर्समध्ये टाकते आणि म्हणते, "मी घाईगर्दीत काही करीत नाही. एक आठवडा मुदत देते. त्यानंतर तुमच्या लाडक्या बायकोची तब्येत बिघडू लागेल. सुरुवात टाच दुखण्यापासून होईल. मग पोटऱ्या, मांड्या, कंबर... ज्या दिवशी स्तंभातून क्षमायाचना कराल त्यादिवशी वेदना थांबतील - नाहीतर माझ्या घरी तुम्हांला नाक घासत यावं लागेल."

आठ दिवसांनी खरोखरच कल्पिताच्या टाचा दुखू लागतात. नंतर पोटऱ्या. नंतर मांड्या.,

दिलीप तिला डॉक्टरांकडे नेतो. "कदाचित पॅरॅलिसिस असेल." ते म्हणतात.

तीन आठवड्यांनी दिलीप अनसूयाकडे जातो. "तुझ्या धमकीचा काही परिणाम झाला नाही. कल्पिता आजारी आहे - पण अर्धांगवायूने.."

अनसूया पर्समधून बाहुली काढून दाखवते. तिच्यात कमरेपर्यंत सुया असतात. "मी सुया खुपसतेय तसतसं तुमच्या बायकोचं दुखणं वाढतंय... शेवटी हृदयात सुई खुपसणार आहे. त्याआधी डोक्याला - डोकेदुखी - भयंकर डोकेदुखी-"

दिलीपला तरीही कल्पिता सांगते, "तुझी विनोदबुद्धी कुठं गेलीय? माझ्या दुखण्यानं तू इतका खचून जाशील असं वाटलं नव्हतं... मला वचन दे... माझं दुखणं विकोपाला गेलं, मला मरण आलं तरी तुझ्यासारखा बुद्धिप्रामाण्यवादी माणूस शरण आला असं असुरी समाधान त्या चेटकिणीला लाभू द्यायचं नाही."

दिलीप परत अनसूयाकडे जातो. तिचा गळा धरतो. "बाहुली कुठाय?"

अनसूया सांगते, "जबरदस्ती करून बाहुली मिळणार नाही. कल्पिता जन्मभर अपंग व बेशुद्ध राहील. जिवंत प्रेम. आपल्या बायकोला असलं मरण देणार तुम्ही!... आणि लक्षात ठेवा. तुम्हाला गोडशी मुलगीही आहे ना! राणी - तिलाही काही व्हायला लागेल. जा घरी.

एखादी सुई मी काढते. कल्पिता शुद्धीवर येऊन बोलेल तुमच्याशी.''

''आपण अंधश्रद्धेविरुद्ध आजवर लिहित आलोय - क्षमा मागायची नाही'' असं कल्पिता त्याला पुन्हा सांगते.. आणि तिचं डोकं परत दुखायला लागतं.

दिलीप मग एक अतींद्रिय मानसशास्त्राचे अभ्यासक प्रा. अग्निहोत्री यांच्याकडे जातो. चेटूक म्हणजे एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीला दिलेला आदेश असे स्पष्ट करून दिलीपला त्या आदेशाविरुद्ध दुसरा जोरदार आदेश देऊन आधीच्या आदेशाचा प्रभाव नष्ट करता येतो असा मार्ग ते दाखवतात.

दिलीपला ते सांगतात - तू तुझ्या वडिलांचा सातवा मुलगा आहेस. तुझे वडीलही तुझ्या आजोबांचे सातवे चिरंजीव होते.. म्हणजे तू सातव्या मुलाचा सातवा मुलगा आहेस...''

नंतर काय होते हे येथे सांगण्याचे कारण नाही. हे नाट्य आणखी रंगत जाते खरे!

अशा उत्कंठावर्धक कथांची या संग्रहात वर्णी लागलेली आहे, त्यामुळे तो वाचायलाच हवा असे वाटतेय ना तुम्हांला? मग उशीर कशाला?


*सातव्या मुलीची सातवी मुलगी, पृष्ठे २०८, एकशेवीस रुपये*


**विविध विषयावरील दर्जेदार नवीन पुस्तके**
**लवकरच उपलब्ध!**

| | | | |
|---|---|---|---|
| **अणसार** | कादंबरी | अनु. अंजनी नरवणे | १८०रु. |
| **एकला चलो रे** | प्रवासवर्णन | दया पवार | ५०रु. |
| **कावळे आणि माणसं** | कथासंग्रह | उत्तम कांबळे | १००रु. |
| **संस्मरणे** | ललित गद्य | शान्ता ज. शेळके | ८०रु. |
| **हसतखेळत ध्यानधारणा** | वैचारिक | मीना टाकळकर | ७०रु. |
| **सुशिलेचा देव** | कादंबरी | वि.स. खांडेकर | ८०रु. |
| **प्रॉडिगल सन्** | कादंबरी | मंगला निगुडकर | २००रु. |
| **वि.स. खांडेकरांच्या कविता** | संदर्भ | संपा. अविनाश आवलगांवकर | १३०रु. |

**मेहता पब्लिशिंग हाऊस,** १२१६, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०.




**कष्टकरी स्त्रीच्या वेदनेचा लोकगीतातील करूण आविष्कार**

# पाणी कुठंवर आलं गं बाई...

**दया पवार**

'बलुतं'कार दया पवार यांच्या 'बाई मी धरण धरण बांधते' आणि 'पाणी कुठंवर आलं गं बाई...' या कविता अत्यंत गाजल्या. दलित स्त्रीच्या जगण्यातले सगळे दुःख त्यांच्या या कवितांद्वारे वाचकांच्या हृदयाला चटका देऊन गेले. 'कोंडवाडा' नंतरच्या त्यांच्या कवितांचा संग्रह त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या कन्या प्रा. प्रज्ञा लोखंडे यांनी सिद्ध केला आहे आणि मेहता पब्लिशिंग हाऊसने तो 'पाणी कुठंवर आलं गं बाई...' या शीर्षकाने प्रकाशित केला आहे. अडतीस कवितांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर (बाबा), येशू ख्रिस्त, भगवान बुद्ध, पंढरीचा राया यांना उद्देशून केलेल्या कविता आहेत. 'माय मराठी'चे गुणगान (!) करणारी एक रचना आहे. दलित स्त्रीच्या भावभावनांचा विविध पातळ्यांवरचा आविष्कार करणाऱ्या काही कविता आहेत. भारताच्या सद्य:स्थितीतल्या विषमतेच्या चटक्यांची जीवघेणी वेदनाही बहुतेक कवितांमधून या ना त्या स्वरूपात प्रकट होत राहते.

आपण या देशात, या समाजात नेमके कुठे आहोत याबद्दलचा संभ्रम सतत त्यांना सतावत राहतो. 'मी तळ्यात की मळ्यात' असा प्रश्न पडतो. अहंकाराचा बुडबुडा फुटला तरी माथ्यावरचा कलंक अजून पुसला गेलेला नाही, अद्वैताचा नाडा हाती लागत नाही, खाली पाय ठेवावा तर निसरड्या शेवाळावरच तो पडतो. (किती पायऱ्या उतराव्या), या तुमच्या दुनियेत तुमच्या संस्कृतीत आपल्या पायाखाली सतत रक्ताचे सडेच पसरलेले दिसतात; तुमच्या पोशाखी संस्कृतीत आपले नागडेपणच उठून दिसते. तुमचा मुखवटा घालून जगणे अशक्य होते. आपण सतत वधस्तंभाकडेच चाललोय अशी पदोपदी जाणीव होते. (वधस्तंभ), अशी आपली घुसमट ते व्यक्त करतात.

अमेरिकेच्या दौऱ्यातील प्रतिक्रिया व्यक्त करणाऱ्या काही कविता या संग्रहात आहेत.

मारुतीसारखे सातासमुद्रापलीकडे उड्डाण करून गेल्यावरही कोकणचा राजा झिम्मा खेळतो हेच गाणे ओठावर येते. तेथील पितळी कुंडीतले कॅक्टस बघून तुळशीवृंदावन आठवते, नाईट क्लबमधील स्ट्रिपटीझ बघताना रासलीला आठवते. निग्रोवस्तीचे हार्लेम बघताना गोलपिठाचे स्मरण होते. हायब्रिड बेवारशी लेकावळ बघताना अक्करमाशांची आठवण होते. त्या कोणा अक्करमाशाच्या आईच्या डोळ्यात गायीची माया आणि आपलीच आई दिसते. अशी त्यांना भारताची सतत आठवण होत राहते.

न्यूयॉर्कमधला स्वतंत्रतादेवीचा पुतळा प्रथम हसताना दिसतो; नंतर त्यावर आपलेच थेंब थेंब रक्त सांडताना दिसते. पंचतारांकित हॉटेलात पाणी मागितल्यावर मद्याची सुरई घेतलेली काळी वेट्रेस राणी 'आर यू इंडियन' असा प्रश्न विचारते, तेव्हा त्या प्रश्नाने जिव्हारी बाण लागल्यासारखी जखम होते. भारतात पाणी मागितल्यावर जात विचारली जाते; येथे स्वतंत्रता देवीच्या देशातही तेच भागधेय वाट्याला येते. कुठेही गेले तरी जात वा देश विचारला जातोच. (स्वतंत्रदेवतेचा पुतळा)

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'खेडी सोडा - शहरात चला' असा संदेश दिला. शहरात गेल्यावर धर्मांधता-कर्मकांड-भेदभाव यांनी अपमानित व्हावे लागणार नाही; असा युक्तिवाद त्यांनी केला होता. परंतु आता या शहरांतूनही चौकाचौकात धर्मांधता उफाळून आलेली दिसते. याबद्दलची खंत प्रकट त्यांनी केली आहे. (बाबा, कालपरवाची गोष्ट), बाबांच्या नावाचा ध्यास घेऊन इतकी वर्षे बरबाद केली म्हणून तुम्ही हसत तर नाही ना असा सवाल करून, मराठवाडा विद्यापीठाला त्यांचे नाव दिले गेले तेव्हा ही काही एका दिवसाची कमाई नव्हे; पुन्हा पुन्हा खांडववन पेटून हरळीच्या मुळीसारखे तक्षक तरले म्हणून आजचा दिवस उगवला असे कवी म्हणतो.

**बाबा, तुमच्या नावाचा विटाळ**
**आज संतांच्या भूमीत धुतला गेला**
**हा जय कुणाचा - पराभव कुणाचा**
**दिव्याने दिवा पेटत गेला**
**मनामनात दडलेला काळोख मिटला. (बाबा)**

येशू ख्रिस्ताचा जन्म गोठ्यात झाला. गावकुसाबाहेर झाला. मानवमुक्तीसाठी तो एकाकी लढला. सत्तेचे जुलमी तख्त त्याने उलथवले, क्रूसावर रक्त सांडून सर्वांवर दयेची पाखर घातली. गाईसारख्या त्याच्या डोळ्यांतून करुणेचा पान्हा उमळून आला. ''येशू तू आमच्यासाठी हंबरलास'' अशी आपली भावना ते प्रकट करतात. भगवान बुद्धही अंजठाच्या लेण्यातील आडव्या फत्तराप्रमाणे चिरनिद्रा न घेता विकलांग आम्रपालीच्या जखमा धूत होता, आणि हाताने तिला विंझणवारा घालत होता; म्हणून कवी आपला आदरभाव व्यक्त करतो. पंढरीच्या रायावर मात्र तो धारेवर धरणाऱ्या सवालांची एकापुढे



एक सरबत्ती करतो.

**पंढरीच्या राया चोखा का बाहेरी?**
**तूच खरा डोंगा दाविली पायरी**
**तुझे भक्तगण देवळाच्या दारी**
**निर्मिली रे भिंत उभे कर कटिवरी**
**कारे घाबरशी, लपशी गाभारी?**

आणि नंतर कवी त्याच्या दांभिकपणावरच सरळ हल्ला चढवतो.

**उन्हापावसात कण्हते पायरी**
**छत्र चामरात तू आत भरजरी**
**चांदीचे डोळे तुझे झाले गारगोटी (पायरी)**

माझा कोंबडा कुणी मारला बाई, (कोंबडा), घुसळ घुसळीते बाई - अजून लोणी का ग न्हाई, (लोणी), मांडव रचता रचता उभी हयात ग गेली (मांडव), आडाचं पाणी बाई खोलवर, हाताला आले फोड (आडाचं पाणी), केलं रक्ताचं शिपान येल मांडवाला गेला, गोऱ्या गोऱ्या दंडावर बाई चोळी मी गोंदली (चोळी), सोन्याची बाई सुरी तिला चांदीची ग धार, कोन दळती दळती जात्यात, बाई मी चिंधीत ग सांधीत, जात्यावरचा वरचा दिसता हात, कोन हासती हासती बाई सूपात (चिलमाचं गाव), या लोकगीतांच्या लयीतल्या गीतांचा बाज स्त्रीजीवनातल्या सुखदुःखांना समर्थपणे कवटाळतो. ''बाई मी धरण, धरण बांधीते, माझं मरण, मरण कांडीते'' आणि ''पाणी कुठंवर आलं गं बाई...'' या दोन गीतांनी तर अनेकांना भुरळ घातली आहे.

'माय मराठी' या कवितेतूनही दया पवार आपली अंतरीची वेदना प्रकट करतात. धर्ममार्तंडांनी कोट रचल्याने पोथीपुराणात मराठी भेटली नाही. पण जात्याच्या ओव्यांत मराठी भेटली; धूळपाटीवर शब्द गिरवता आले, मूक नायकाच्या हाती लेखणी आल्यावर आता दुःखाची गाणी वेशीवर टांगण्याचे बळ लाभले. आता मात्र 'माय मराठी गे तुझे पांग कसे फेडू' असे गदगदून आले आहे.

दया पवार यांच्या अल्पाक्षरी कवितेतील स्त्रीमनाचे भावदर्शन आणि एक दलित म्हणून भागाव्या लागलेल्या दुःखाचे निवेदन संवेदनाक्षम मनांवर नक्कीच आघात करील.

***पाणी कुठंवर आलं गं बाई..., पृष्ठे ४०, पंचवीस रुपये***

*दिवाळी अंकातील स्पर्धा (१) नावे कळवा. बक्षीस मिळवा. स्पर्धा (२) नावे कळवा. बक्षीस मिळवा. व दिवाळीनिमित्त खास स्पर्धा.* **या स्पर्धांचे निकाल जानेवारी९९च्या अंकात जाहीर केले जातील.**

# श्रद्धांजली

## विश्राम बेडेकर

मराठी साहित्य, नाट्य आणि चित्रपट क्षेत्रातील चतुरस्र प्रतिभेचे उत्तुंग प्रज्ञावंत विश्वनाथ चिंतामणी तथा विश्राम बेडेकर यांचे ३० ऑक्टोबरला सकाळी एका खाजगी रुग्णालयात देहावसान झाले.

अगदी मोजके लेखन करूनही साहित्याच्या अनेक विभागांत आपला ठसा विश्राम बेडेकर यांनी उमटविला, हेच लेखक म्हणून त्यांचे सामर्थ्य होते. लेखनातून रंजनाबरोबर जीवनाचे दर्शन आणि आकलन यांचा प्रत्यय येत नाही, तोपर्यंत आपले वाङ्‌मय खुजेच राहणार आहे, असे विदर्भ साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून बोलताना त्यांनी बजावले होते. त्यांना तसे सांगण्याचा हक्क होता, कारण त्याप्रकारचा कस त्यांच्या साहित्यकृतींमध्ये होता. त्यामुळेच त्यांचा प्रभाव इतकी वर्षे कायम आहे. दुसरे महायुद्ध सुरू होण्याच्या बेताला बेडेकरांनी त्यांची एकमेव कादंबरी 'रणांगण' लिहिली.

एका प्रसंगाचे वर्णन करताना त्यांनी लिहिले होते. 'ज्यांना देश नाही, मातृभाषा नाही, पण जागतिक संस्कृतीच्या प्रगतीची धुरा प्रमुखपणे वाहण्याचे भाग्य येशूनंतर ख्रिस्तापासून आइन्स्टाइनपर्यंत ज्यांना लाभले, अशी ही ज्यू जात. मी निरखून पाहिले. एक राष्ट्रचे राष्ट्र या माणसांवर सूड घेते आहे! यांचा काय अपराध? गेल्या महायुद्धात जम्रनीचा विश्वासघात ज्यूंनी केला, असे नाझींचे म्हणणे. पण हेच द्वेषाचे तत्त्वज्ञान इतर देशांतून फैलावत चालले तर काय होईल?' राष्ट्रीय मुक्तीच्या आड येणाऱ्या छोट्यामोठ्या जमाती, त्यांच्यावरचे परकीय सत्तेचे स्वार्थी रक्षण उद्या नाहीसे झाले, तर त्यांचे आजचे अपराध उद्या विसरले जातील का?... तर काय सुधारणेबरोबर हे द्वेषाचे डोंब भडकत जाणार?' अगदी आजकालचेच वाटावे असे हे प्रश्न आहेत, साठ वर्षांपूवीचे. हे बेडेकरांच्या लेखनाचे वैशिष्ट्य आहे. ते शिळे वाटत नाही. अगदी नव्या धाटणीची आणि वेगळ्या विषयावरील ही कादंबरी मराठी साहित्यातील मानदंड ठरली. आशय, तंत्र, प्रकटीकरणाची शैली अशा सर्वच दृष्टींनी ही कादंबरी कशी थोर आहे, हे सांगण्यासाठी या जेमतेम सव्वाशे पानांच्या कादंबरीवर हजारो पानांचा मजकूर लिहिला गेला.

'ब्रह्मकुमारी' या नाटकाने वाङ्‌मयीन जीवनाची सुरुवात बेडेकरांनी केली. ते नाटक फारसे चालले नाही, तरी त्याचे जाणकारांनी कौतुक केले होते. या नव्या लेखकाचे सामर्थ्य त्यांना उमगले होते. 'ठकीचे लग्न' सारखे, खऱ्या अर्थाने दर्जेदार विनोदी चित्रपट त्यांनी दिले.



त्यांची विलक्षण प्रतिभा तेथेही मध्येच दर्शन देऊन जात असे. पण ती बाब आपल्या चित्रपटसृष्टीला, निदान त्या काळात तरी, फारशी मानवण्याजोगी नव्हती. त्यामुळेच 'प्रभात'सारख्या संस्थेत किंवा व्ही. शांताराम यांच्याबरोबर फार काळ राहणे त्यांना शक्य झाले नाही. तरीही 'रामशास्त्री' सुरुवातीलाच अडला, त्यावेळी त्यांनी समर्थपणे तो तडीला नेला, तोही श्रेयनामावलीत स्वत:चे नाव येणार नाही, याची माहिती असून! पण त्या माध्यमावर आपली किती हुकूमत आहे, हे मात्र त्यांनी दाखवून दिले होते. लोकमान्य टिळक आणि विनोबा भावे यांच्यावर त्यांनी बनविलेले माहितीपट, हे मात्र माहितीपट बनविणाऱ्यांसाठी आदर्श बनून राहिले आहेत. त्यांतही त्यांची छाप जागोजागी जाणवते.

काही काळ परदेशात राहून महर्षी योगी यांच्या 'भावातीत ध्यान' या चळवळीसाठी छोटे चित्रपट बनविण्याची कामगिरी त्यांनी स्वीकारली. स्वित्झर्लंडच्या त्या निसर्गरम्य परिसरात निळे आकाश आणि आल्प्सच्या उत्तुंगतेचे सौंदर्य यांनी बेडेकर भारावून गेले होते. आश्रमाजवळच्या सरोवराचे वर्णन त्यांनी केले. त्यांच्यातील लेखक पुन्हा प्रकटला. ते त्यांच्या पत्नीला–मालतीबाईंना पत्रामागून पत्रे लिहू लागले. पुढे 'सिलिसबर्गची पत्रे' म्हणून ती प्रसिद्धही झाली. त्यांनीच लिहिले आहे की, 'मानसिक दाहात सुकून गेलेली प्रतिभेची गुप्तगंगा सिलिसबर्ग येथील वास्तव्यात अवतरली.' या जाग्या झालेल्या त्यांच्यातील लेखकाला मग त्याचा जिव्हाळ्याचा मैत्री हा विषय खुणावू लागला. केवळ मैत्रीसाठी विश्वनाथ हे आपले आणि श्रीराम हे मित्राचे नाव एक करून 'विश्राम' हे नाव धारण करणाऱ्या बेडेकरांना ती मैत्री तुटण्याचा अनुभवही घ्यावा लागला होता. त्याचाच प्रत्यय त्यांच्या 'एक झाड दोन पक्षी' या बहुचर्चित आत्मवृत्तातून येतो.

चिंतनमयी प्रज्ञेचे वर्णन करताना त्यांनी म्हटले होते, 'नेहमी मुद्याला धरून राहणे हेच हिचे सामर्थ्य! काही झाले तरी पाय जमिनीला घट्ट धरून ठेवायचे, त्यांना कधीही लोंबू द्यायचे नाही, ही या प्रज्ञेची स्वाभाविक वृत्ती.' अशा वृत्तीला त्यांच्या असाधारण प्रतिभेची जोड मिळाली होती. हा प्रज्ञावंत इतरांपेक्षा आणि इतरांपासूनही वेगळाच होता!

## 'काँटिनेंटल' अनंतराव कुलकर्णी

काँन्टिनेंटल प्रकाशनचे संस्थापक अनंतराव कुलकर्णी यांचे दि. ६ नोव्हेंबर १९९८ रोजी निधन झाले.

अनंतराव अंबादास कुलकर्णी यांचा जन्म १९ सप्टेंबर १९१७ रोजी झाला. काँटिनेंटल प्रकाशन संस्थेद्वारे मराठी साहित्याची सेवा करणाऱ्या अनंतरावांनी यशस्वी प्रकाशकाबरोबरच एक सहृदय, प्रामाणिक माणूस म्हणून प्रतिमा जपली होती. गेल्या पन्नास वर्षांहून अधिक काळ 'काँटिनेंटल प्रकाशन'चे नाव प्रकाशन क्षेत्रात गाजत आहे. अतिशय कष्टातून अनंतरावांनी हे यश मिळविले. त्यांना अनेक मानसन्मान लाभले; परंतु अखेरपर्यंत ते विनयशील राहिले.

जुन्नर परिसरातून १९३८च्या सुमारास तीन मित्र पुण्यास आले, ते प्रकाशन संस्था सुरू करण्याच्या उद्देशानेच. त्यापैकीच एक अनंतराव कुलकर्णी. जुन्नरच्या गुरुवर्य रा. प.

सबनीस यांच्या 'न्यू स्कूल'चे संस्कार घेऊन आलेल्या अनंतरावांनी गोपाळ पाटणकर व जनार्दन महाजन या आपल्या मित्रांसह एक जून १९३८ला 'काँटिनेंटल' प्रकाशन संस्था सुरू केली. वास्तविक अनंतरावांच्या मनात 'शारदा प्रकाशन' असे अस्सल मराठमोळे नाव होते. पण पाटणकरांच्या आग्रहामुळे त्यांना 'काँटिनेंटल' हे नाव ठेवावे लागले. त्या वेळी महाराष्ट्रात काही निवडक प्रकाशन संस्था होत्या; काही प्रसिद्ध होत्या. बऱ्याचशा उभारी धरू पाहत होत्या. अनंतरावांनी मोठ्या निश्चयाने या अनिश्चित क्षेत्रात पाऊल टाकले. पुढे 'काँटिनेंटल'ची धुरा एकट्या अनंतरावांनी आपल्या समर्थ खांद्यावर पेलली.

टिळक रस्त्यावर महाराष्ट्र बँकेसमोर 'काँटिनेंटल' चा छोटेखानी संसार सुरू झाला. दत्त रघुनाथ कवठेकर यांचा 'नाद-निनाद' हा कथासंग्रह हे 'काँटिनेंटल' चे पहिले प्रकाशन. साहित्यसम्राट न. चिं. केळकर यांच्या हस्ते एक जानेवारी१९३९ रोजी वाजतगाजत हे प्रकाशन करण्यात आले. शांताबाई नाशिककर, वि. स. खांडेकर, ना. सी. फडके, अनंत काणेकर, श्यामराव ओक, शांता शेळके, अरविंद गोखले आदी अनेक प्रसिद्ध व नवोदित साहित्यिकांच्या कलाकृती 'काँटिनेंटल'ने प्रकाशित केल्या. शांता शेळके यांचा पहिला कवितासंग्रह 'वर्षा' हा 'काँटिनेंटल' चाच! अरविंद गोखले हे 'काँटिनेंटल' चे प्रमुख कथाकार.

केवळ साहित्यिकांची ग्रंथसंपदाच नव्हे, तर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठीची मार्गदर्शके, क्रमिक पुस्तके, विविध विषयांवरील भाषांतरित पुस्तकेही अनंतरावांनी प्रकाशित केली. 'काँटिनेंटल' चा पसारा पुढे एवढा वाढला, की १९६१च्या दरम्यान प्रकाशनांची एकूण संख्या सुमारे ४८० एवढी झाली. १९६१च्या पानशेत प्रलयात 'काँटिनेंटल' चे खूप नुकसान झाले. अनंतरावांनी या संकटाला धीरोदात्तपणे तोंड दिले.

कवी यशवंत यांच्या 'छत्रपती शिवराय' या महाकाव्याचा १९६८मध्ये झालेला दिमाखदार प्रकाशन समारंभ हा 'काँटिनेंटल' च्या शिरपेचातील एक मानाचा तुराच म्हणावा लागेल.

श्री. ना. पेंडसे यांच्या 'तुंबाडचे खोत' या कादंबरीचे प्रकाशन अनंतरावांनी तुंबाडमध्येच केले. 'काँटिनेंटल' चे हे १००१वे प्रकाशन.

एक जून १९७१ला 'काँटिनेंटल' चे विजयनगरच्या नव्या जागेत स्थलांतर झाले. अनंतरावांचे चिरंजीव अनिरुद्ध व रत्नाकर यांनाही त्यांनी प्रकाशन व्यवसायात भागीदार करून घेतले. अनिरुद्ध कुलकर्णी यांनी अनुवादित पुस्तकांची परंपरा पुन्हा सुरू केली. 'काँटिनेंटल' च्या पुस्तकांचे बाह्यांगही अधिक आकर्षक, देखणे झाले. राज्य सरकारची उत्कृष्ट पुस्तकनिर्मितीची अनेक पारितोषिके 'काँटिनेंटल' ला मिळाली. शेतीविषयक पुस्तकांचे प्रकाशन हेही अनंतरावांच्या संस्थेचे वैशिष्ट्य. नव्या पिढीतील नव्या दमाच्या लेखकांची पुस्तकेही 'काँटिनेंटल' ने प्रकाशित केली.



प्रकाशनासारख्या बेभरवशाच्या व्यवसायात पाऊल टाकून, केवळ प्रामाणिकपणा, सच्छिलपणा या गुणांवर तो यशस्वी करणारे अनंतरावांसारखे व्यक्तित्व विरळा. निवृत्त झाल्यानंतर त्यांनी नारायणगावला जाऊन सबनीस विद्यामंदिराच्या कामकाजात गुंतवून घेतले होते.

## कुसुमताई नारगोळकर यांचे निधन

गेली ५० वर्षे डहाणूजवळील कैनाड गावी आदिवासींच्या सेवेत अविरत कार्यरत असलेल्या आदिवासी ग्राम सेवा संघाच्या मानद सचिव कुसुमताई नारगोळकर यांचे २९ ऑक्टोबर रोजी पहाटे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांचे वय ७६ होते. त्यांच्यामागे त्यांचे सर्वोदयी पती वसंतराव नारगोळकर आहेत.

महात्मा गांधींनी दिलेल्या 'खेड्यात जा' या आदेशानुसार वसंतराव व कुसुमताई गेली ५० वर्षे कैनाड येथे आदिवासी सेवेचे व्रत घेऊन तपस्वी जीवन जगले. आदिवासींच्या प्रश्नावरील 'जंगलचे राजे' चिनी आक्रमणावरील 'जेथे चिनी सैन्याने कब्जा केला होता' या तसेच 'आम्ही पाहिलेला चीन' या कुसुमताईंनी लिहिलेल्या पुस्तकांचे हिंदी, इंग्रजी व गुजराती भाषेतही अनुवाद झाले आहेत. 'अनिश्वरवाद व डोळस श्रद्धा' या विषयावरील परिसंवादातील भाषणांचे त्यांचे संकलनही पुस्तकरूपाने उपलब्ध आहे.

## भाषाशास्त्रज्ञ प्रा. कत्रे यांचे निधन

प्रख्यात भाषाशास्त्रज्ञ व प्राध्यापक सुमित्र मंगेश कत्रे यांचे कॅलिफोर्निया मुक्कामात २१ ऑक्टोबर रोजी निधन झाले. ते ९३ वर्षांचे होते.

भाषाशास्त्र विषयावर विपुल लेखन त्यांनी केले, तसेच डेक्कन कॉलेजसह अनेक विद्यापीठांत भाषाशास्त्र - अभ्यासाची प्रगत केंद्रे स्थापण्यास मदत केली. संस्कृत भाषेतील ऐतिहासिक तत्त्वावर आधारित 'सर्वसंग्राहक शब्दकोश' बनविण्याची योजना त्यांनी होती घेतली. यातील काही खंड प्रकाशित झाले आहेत.

## ज्येष्ठ हिंदी लेखक 'नागार्जुन' यांचे निधन

ज्येष्ठ हिंदी साहित्यिक वैद्यनाथ मिश्र ऊर्फ 'नागार्जुन' (वय ८७) यांचे ५ नोव्हेंबर रोजी निधन झाले. साहित्यक क्षेत्रात 'बाबा नागार्जुन' नावाने ओळखले जाणारे मिश्र यांचा जन्म तरौना येथे १९११ मध्ये झाला.

नागार्जुन यांनी मैथिली भाषेत काव्यलेखनाला सुरवात केली. डाव्या विचारसरणीच्या प्रभावामुळे त्यांच्या साहित्यात विद्रोह व अन्यायाविरुद्धची चीड यांचे प्रतिबिंब पडले. क्रांतिकारी लोककवी म्हणून ते सर्वसामान्यांना परिचित झाले. स्वातंत्र्यानंतरही ते उपेक्षितांच्या बाजूने लढत राहिले. १९४७ मध्ये आणीबाणीत त्यांना तुरुंगवास पत्करावा लागला. जमीनदारांविरुद्ध गरीब शेतकऱ्यांची चळवळ उभारण्यात त्यांचा सहभाग होता.

## वाचावेसे असे काही...

| | | |
|---|---|---|
| झोंबी | आनंद यादव | २००रु. |
| काचवेल | आनंद यादव | २००रु. |
| चौघीजणी | अनु. शान्ता ज. शेळके | ३००रु. |
| आंधळ्याचे डोळे | अनु. शान्ता ज. शेळके | १५०रु. |
| एडविना आणि नेहरू | अनु. वि. स. वाळिंबे | २५०रु. |
| तंतू | अनु. सौ. उमा कुलकर्णी | ४५०रु. |
| डायरी ऑफ ॲन फ्रँक | अनु. मंगला निगुडकर | १७५रु. |
| चीपर बाय दि डझन | अनु. मंगला निगुडकर | १००रु. |
| रोदँ | शांताराम पारपिल्लेवार | २९०रु. |
| मी आणि माझा बाप | द. ता. भोसले | १००रु. |
| पावसाआधीचा पाऊस | शान्ता ज. शेळके | ९०रु. |
| मोडेन पण वाकणार नाही | व. पु. काळे | ७०रु. |
| मायामृग | अनु. सौ. उमा कुलकर्णी | १००रु. |
| कालिंदीच्या तीरावरती | य. दि. फडके | ७५रु. |
| पृथ्वीवर माणूस उपराच! | सुरेशचंद्र नाडकर्णी | ५०रु. |
| परिचय | अनु. माधवी देसाई | ८०रु. |
| निमित्तानिमित्ताने : राजीव गांधी | अनु. शान्ता ज. शेळके | ७०रु. |
| निर्बाचित कलाम | अनु. मृणालिनी गडकरी | १५०रु. |
| पासंग | दया पवार | १००रु. |
| रंग सुखाचे | डॉ. रमा मराठे | ६५रु. |
| कोलाज | शिरीष पै | ८०रु. |
| द प्लेन ट्रूथ | अनु. माधव मोर्डेकर | २५०रु. |
| फ्रीडम ॲट मिडनाईट | अनु. माधव मोर्डेकर | ३००रु. |
| अस्वस्थ दशकाची डायरी | अविनाश धर्माधिकारी | ३००रु. |
| आय डेअर : किरण बेदी | अनु. आशा कर्दळे | २००रु. |
| नाथ हा माझा | कांचन घाणेकर | २५०रु. |
| प्रवाहातील पक्षी | निलू गव्हाणकर | ७५रु. |
| युगंधर श्रीकृष्ण : एक चिंतन | शिवाजी सावंत | ६०रु. |
| आनंदाचे अंतरंग : मदर तेरेसा | अनु. फ्रान्सिस दिब्रिटो | ७५रु. |
| करार एका ताऱ्याशी : कुसुमाग्रज | संपा. वसंत पाटील | ५०रु. |
| हा खेळ बाहुल्यांचा | डी. एस्. इटोकर | ५०रु. |
| एकविसावं शतक | निरंजन घाटे | १५०रु. |



## फुले आणि काटे

### ब्रिटानिकावर बंदी

'एन्सायक्लोपिडिया ब्रिटानिका' या जगप्रसिद्ध विश्वकोशाच्या संगणकीय आवृत्तीची आयात करण्यावर केंद्र सरकारने बंदी घातली आहे. या आवृत्तीत देशाची सरहद्द चुकीची दाखविली आहे, तसेच 'काश्मीर हा भारत, पाकिस्तान आणि चीन यांच्यामधील वादग्रस्त प्रदेश' असल्याचे या आवृत्तीत वर्णन केलेले असल्याने ही बंदी घालण्यात आली आहे. काश्मीर हा भारताचाच भाग आहे, यात कोणतीही शंका नाही. पाकिस्तानने घुसखोर पाठवून हा प्रदेश बळकावण्याचा प्रयत्न केल्याने काही भाग पाकिस्तानाच्याच ताब्यात राहिला आहे. त्या भागाला आपण 'पाकव्याप्त काश्मीर' म्हणतो, तर पाकिस्तान त्याला 'आझाद काश्मीर' म्हणते. तेथे परदेशी ग्रंथात आणि नकाशात हा भाग पाकिस्तानात दाखवितात आणि आपण सातत्याने त्याबद्दल नापसंती व्यक्त करतो. ब्रिटानिका, वर्ल्ड बुक, अमेरिकन किंवा कुठल्याही विश्वकोषात, परदेशी नकाश संग्रहात ही चूक असते आणि ती पुस्तके भारतात विकली जाण्यापूर्वी 'सरहद्दी चुकीच्या आहेत' असा त्यावर शिक्का मारला जातो.

ब्रिटिश, अमेरिकन किंवा कोणाही परदेशी प्रकाशकाचा हा खोडसाळपणा आहे, असे आपण म्हणतो; तर ते लोक भाबडेपणाचा बहाणा करून आम्ही प्रत्यक्ष ताब्याची वस्तुस्थिती मांडतो, असे समर्थन करतात. त्यावर आपण असहमत असल्याचा शिक्का मारण्याचा मार्ग काढला आहे. छापील पुस्तकांबाबत जो मार्ग वापरला जातो, तो संगणकीय आवृत्तीला का लागू नसावा? ब्रिटानिकाचा विश्वकोश आजही जगातील सर्वोत्तम आहे. त्यात असणारी कोणत्याही विषयावरील माहिती मूळ ग्रंथ वाचावा इतकी परिपूर्ण असल्यासारखी असते. त्याची अखेरची छापील आवृत्ती जुनी असल्याने संगणकीय आवृत्ती उपयुक्त ठरणार होती. बंदी घालून आपण त्या ज्ञानाचीच आयात करण्याला मनाई करतो आहोत. असे प्रकार होता कामा नयेत. यावरील खरा उपाय पाकिस्तानने बळकावलेला काश्मीरचा भाग मुक्त करणे हा आहे. लष्करी कारवाई करून तो मुक्त करता येत नसेल तर शिक्का मारणे, तेवढा भाग वगळणे, हे उपाय आहेत. संपूर्ण आवृत्तीला मनाई, हा ज्ञानाची कवाडे बंद करण्याचा प्रकार ठरेल.

*(दै. सकाळ १-११-९८)*

### ललित लेखन

परवा एका साहित्यिक कार्यक्रमाला गेले होते. ललित लेखनावरचं अध्यक्षांचं भाषण सुरेख, झुळझुळतं होतं. ''नवनिर्मितीचा आनंद वगैरे नाटकी शब्द विसरा. ललित लेखन

म्हणजे पुन:प्रत्यय... आपल्याच मनात केव्हा तरी चमकून गेलेले विचार, खोल तळाशी रुतून बसलेले अनुभव, भावलेले, चटका लावून गेलेले प्रसंग - या सगळ्यांचं घासूनपुसून केलेलं सादरीकरण म्हणजे ललित लेखन... ती नवनिर्मिती नसते, नवरचना असते."

पण तरीही ललित लेखन हे लेखकाच्या आयुष्यातलं मीठ असतं... त्याच्या लेखनाची आणि अनुभवाचीही चव वाढवणारं...

ते वाक्य ऐकलं आणि एकदम दिवा उजळला डोक्यात. ट ला फ जुळवून केलेलं माझं चिमूटभर ललित लेखन डोळ्यांसमोर आलं आणि जाणवलं, आपण लहानपणी केलेला निश्चय आपल्याही नकळत पार पाडलाच म्हणायचा. शेवटी काढलंच की मोडीचं दुकान...

नाहीतरी ललित लेखन म्हणजे दुसरं काय?

*प्रमोदिनी वडके-कवळे*

## बिनचेहऱ्याचे पुरुष

गौरी देशपांड्यांच्या कथा तर इतक्या स्त्रीकेंद्री आहेत की त्यातले पुरुष बिनचेहऱ्याचेच वाटावेत. पुरुष गरीब बिचारा, तिच्यावर भाळणारा, गप्प बसणारा, तिच्यावर भक्ती करणारा, बायकांना प्रेमात पाडायची सवय असणारा आहे. अशी माणसे यायच्या जायच्या वाटेवर सापडतात. (सोन्याचा तुकडा) वेसणीची आवड असणारा बैलोबा असतो (उद्दालक ऋषींची बायको) कधी मॉडर्न असून हिंदीच असतो (परंतु मुर्खाची) तसं म्हटलं तर तो काय कुणीही आनंदाने सामावून घ्यावे असाच होता, अबोल, अनाग्रही, आनंदी त्याच्या स्वभावातील उपरोध, हट्ट आणि इन्टेन्सिटी तो क्वचितच व्यक्त करतो. (आहे हे असं आहे) बस्स्. पुरुषांच्या स्वभावाचे पैलू या व्यतिरिक्त खूप वेगळे दिसत नाहीत. बायका मात्र कांगावखोर, आक्रम, वादंगी, फटकळ, नाकावर राग असलेल्या लहरी, कटकटखोर, दिसायला अतिशय सुंदर, आकर्षक अशा आहेत. त्यांना प्रेमात पडायला मिळण्याची अडचण येत नाही, आणि हे प्रेमही चिरकाल टिकावेच असा बायकांचाही आग्रह नाही, अर्थातच पुरुषांचे वागण्याचे धोरण सबुरीचे असले तरी ते 'सगळे मिळवणारे आहेत. कावळा चिमणीच्या कथेतील चिमणा लबाड आहे. लंपटपणा करून कावळीकडून सगळे मिळवून पुन्हा कावळीला दूर ठेवून नामानिराळा राहणारा आहेच. पुरुषांच्या चेहरेपट्टीची व कशा प्रकारच्या पुरुषांच्या प्रेमात, बायका पडतात याची वर्णने त्यांच्या अनेक कथांमधून बाईने सहज प्रेमात पडावे असा तो हडकुळा, लांब नाकाचा, हिरव्या डोळ्यांचा आणि उद्दाम, (सवय) नाक नकटं, रंग रापून काळा झालेला केस मूळात पिंगे पण आता सॉल्ट ॲन्ड पेपर रंगाचे, डोळे काळे, पातळ, लांबण लांब जिवणी, हसला की या कानापासून त्या कानापर्यंत, चेशार कॅटसारखा, लहानसे कान, सुरेख, सुबक सेन्सिटिव्ह. कोल्ह्याच्या कानांसारखे टोकीदार (आहे हे असं आहे.) सिल्व्हीचं हसू मोठं मजेदार असतं तो आधी आपल्या कपाळाला आठ्या घालतो, मग त्याच्या डोळ्याभोवती सुरकुत्या पडतात, मग हळूहळू सर्व चेहरा उजळत जातो. (उद्दालक ऋषींची बायको) गौरी देशपांड्यांच्या कथेतील पुरुषांना नावे आहेत, पण स्वतंत्र व्यक्तित्वे



नाहीत, पुरुषांची शरीरवर्णने येतात, पण ती व्यक्ती म्हणून त्यांना उभी करू शकत नाहीत. शरीराची ठेवण सांगितली जाते, पण मनाची नाही. हट्टी बाईच्या आयुष्यात येणारा साधे सरळ पुरुष एवढेच त्यांचे स्थान आहे, अशा आक्षेपांना गौरी देशपांडे यांनी उत्तर दिले आहे. (रुची जाने ८४, पान ३०) आपण स्त्रीवादी असल्याने पुरुष प्रतिमेला जाणीवपूर्वक गौणत्व दिले हे त्यांचे समर्थन मात्र पटणारे नाही. कारण स्त्रीवादी साहित्यिकांनाही पुरुषांचे ठसठशीत कंगोऱ्यासकट भलेबुरे चित्रण करता येणे शक्य असते, कथेत दुय्यम स्थान देणे, म्हणजे धूसर व्यक्तीला रेखाटणे वा एकांगी चित्रण करणे नव्हे.

*(अश्विनी धोंगडे, किस्रीम, दिवाळी ९८)*

## शालेय ग्रंथपाल डायरी

माध्यमिक स्तरावर ग्रंथालयाकडे पहाण्याचा सक्रीय दृष्टीकोन विचारात घेऊन या क्षेत्रात कार्यरत होऊ इच्छिणाऱ्या व नव्याने या क्षेत्रात येऊ इच्छिणाऱ्या ग्रंथपालांना मार्गदर्शन व्हावे याच दृष्टिकोनातून सावंतवाडी येथील ग्रंथपाल एस.एच. रेडकर यांनी श्री मोडक यांच्या सहकार्याने 'शालेय ग्रंथपाल डायरी' प्रकाशित केलेली आहे.

नियतकालिकांची यादी, महत्त्वाची परिपत्रके, वार्षिक अहवाल, मूल्यशिक्षण व सामान्यज्ञान या विषयांची माहिती देण्यात आलेली आहे.

शालेय ग्रंथपाल डायरी : गीताई प्रकाशन, केबल इंटरप्राइजेस, पुणे २.

## ग्रंथालयांना पर्याय नाही - मतकरी

राज्याच्या प्रत्येक शहर-गावात लहान-मोठ्या ग्रंथालयांचे जाळे निर्माण झाले, तर पुस्तकांच्या खपात वाढ होईलच. शिवाय वाचनाची संस्कृतीही निर्माण होईल. ग्रंथालयांना मुख्यमंत्री, शिक्षणमंत्री व सांस्कृतिक खात्यानेही घसघशीत मदत करावी, अशी अपेक्षा संमेलनाध्यक्षांनी व्यक्त केली. ग्रंथप्रसार हे सरकारचे एक उद्दिष्ट असावे व ग्रंथालय प्रसार झाल्यावर हे उद्दिष्ट बरेचसे साध्य होईल. ज्यांची मराठी भाषेची समज उत्तम आहे, असे अनेक लोक आहेत. त्यांनी मनावर घेतल्यास ते शब्दरचना, वाक्यरचना दुरुस्त करण्यास सांगू शकतात. मराठीचे प्राध्यापक, घराघरांतील मराठी नित्यनेमाने वापरणारी वयस्कर मंडळी मुलांना चूक-बरोबर सांगू शकतात. त्यांनी आपले कर्तव्य टाळणे योग्य नव्हे. तसेच इंग्रजीच्या शुद्धलेखनाचे जसे दडपण विद्यार्थ्यांवर असते, ते मराठीबाबत नसते.

T BOOK CLUB
या क्लबचे सभासद व्हा. आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके निम्म्या किंमतीत मिळवा!

**T बुक क्लब**चे आजच सभासद व्हा व उत्तमोत्तम अनुवादित पुस्तक निम्म्या किंमतीत मिळवा. **सभासद फी - फक्त २०रु.** या वर्षीच्या क्लबमधील दोन पुस्तके उपलब्ध!

*संपर्क :* **मेहता पब्लिशिंग हाऊस**, १२१६, सदाशिव पेठ, पुणे ३०.

## मेहता मराठी ग्रंथजगत वर्गणीचे नूतनीकरण करा!

*वाचकमित्रहो,*

मराठी ग्रंथविश्वाची अद्ययावत माहिती देणाऱ्या मराठी ग्रंथजगतचे आपण वर्गणीदार आहात याचा आम्हाला अभिमान वाटतो.

आपला वार्षिक नूतनीकरण करण्याचा व्याप वाचावा म्हणून आम्ही सवलतीची योजना जाहीर करीत आहोत.

**एक वर्षांची वर्गणी ८०रुपये तीन वर्षांची वर्गणी २००रुपये बचत ४०रुपये**

**पाच वर्षांची वर्गणी ३००रुपये बचत १००रुपये**

पाच वर्षांची वर्गणी एकदम पाठवल्यास आपणांस सर्वांत जास्त लाभ होईल. पुढे वर्गणी वाढली तरी आपल्याला याच वर्गणीत अंक नियमित मिळत राहतील.

*वर्गणी पाठवण्याचा पत्ता :*

**मेहता मराठी ग्रंथजगत**, १२१६, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३०.

स.न.वि.वि.

मला ग्रंथजगतचे १/३/५ वर्षांसाठी वर्गणीदार व्हायचे आहे. सोबत ८०/२००/३००रु.चा ड्राफ्ट/मनीऑर्डर पाठवत आहे.

माझे नाव ______________________

पत्ता ______________________


______________________


गाव/शहर ______________ पिनकोड नंबर ______________


माझ्या पुढील मित्रांनाही हे मासिक १/३/५वर्षे भेट म्हणून माझ्यातर्फे पाठवावे. त्यांचीही वर्गणीही सोबत जोडत आहे.


१) नाव ______________________
पत्ता ______________________
______________________
गाव/शहर ______________ पिनकोड नं. ______________


२) नाव ______________________
पत्ता ______________________
______________________
गाव/शहर ______________ पिनकोड नं. ______________



डिसेंबर १९९८

# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ वर्ष दुसरे
◆ अंक बारावा

## अनुक्रम

संपादकीय ---------- २
संभाव्य साहित्याची रुपरेषा : डॉ. आनंद यादव ---------- ६
माहिती तंत्रज्ञान युगातील नवा समाज : डॉ. बाळ फोंडके ---------- १०
साहित्यवार्ता ---------- १३
महाराष्ट्र राज्य ग्रंथ पुरस्कार यादी ---------- १८
पुस्तक परिचय ---------- २०
श्रद्धांजली ---------- ४०
फुले आणि काटे ---------- ४५

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे**
फोन : ४७६९२४

❑ कार्यकारी संपादक
शंकर सारडा

❑ संपादन सहाय्य
सुनीता दांडेकर

❑ मांडणी
मेहता पब्लिशिंग हाऊस

❑ अंकाची किंमत ५ रु.
वार्षिक वर्गणी ५० रु.

❑ वार्षिक वर्गणी मनीऑर्डरने पाठवावी.

❑ दरमहा १५ तारखेस हे मासिक प्रसिद्ध होईल.

*संपादक-मुद्रक-प्रकाशक :* **सुनील मेहता,** मेहता पब्लिशिंग हाऊस, १२१६, सदाशिव, पुणे - ३०.
*अक्षरजुळणी :* **मेहता पब्लिशिंग हाऊस,** १२१६, सदाशिव, पुणे - ३०. फॅक्स : २१२-४७५४६२
*या अंकातील लेखकांची मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*

## या चौकोनात २२ पुस्तकांची नावे दडलेली आहेत. काढा शोधून!

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| हि | आं | ध | ळी | घ | ज्ञा | स्टे | फी | सा |
| आ | म | ध्य | स्थ | र | न | ता | | ग |
| नं | ल | कों | | अ | दी | व | ध | र |
| दा | प | चां | द | रु | प | दे | शो | ती |
| चे | ड | चौ | ड | णा | चा | न | रि | री |
| अं | रे | वि | घी | | ती | व | प | र्व |
| त | पा | टा | ल | ज | मू | ल | डी | णी |
| रं | ण्या | ळ | ज्जा | | ची | य | हि | गि |
| ग | सं | पा | उ | ठा | व | ण | फे | रा |

## उत्तर सांगा, बक्षीस मिळवा!

या अंकातील पुस्तक परिचयांवरुन खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

१) दया पवार यांच्या नव्या काव्यसंग्रहाचे नाव
२) 'युगंधर'मधील कथांचा प्रकार
३) 'भारत विकणे आहे' या अनुवादित पुस्तकाचे मूळ नाव
४) चेटकिणीची कथा असणाऱ्या पुस्तकाचे लेखक
५) कामगार नेते भाई कोतवाल यांच्या चरित्राचे लेखक

वरील दोन्ही स्पर्धांची बरोबर उत्तरे पाठवणाऱ्यांपैकी (लॉट टाकून येणाऱ्या) पहिल्या तीन स्पर्धकांना प्रत्येकी १०० रु.ची पुस्तके बक्षीस. **पाठवण्याची अंतीम तारीख २० जानेवारी, १९९९.**

*आमचा पत्ता :* **मेहता मराठी ग्रंथजगत,** १२१६, सदाशिव, पुणे–४११०३०.

## सप्टेंबर९८ स्पर्धा (१) पुस्तकांची नावे कळवा. निकाल

१) **व.पु. काळे यांच्या १० कथासंग्रहाची नावे :**
दोस्त, चिअर्स, झोपाळा, वपु८५, ठिकरी, वपुर्झा, कर्मचारी, फॅन्टसी एक प्रेयसी, निमित्त, मोडेन पण वाकणार नाही.

२) **वि.स. वाळिंबे यांनी लिहेलेली राजकीय विषयावरील ५ अनुवादित पुस्तकांची नावे :**
फसलेला क्षण, एडविना आणि नेहरु, वुई द नेशन, ऑपरेशन थंडर, बंगलोर ते रायबरेली

३) **वि.स. खांडेकर यांच्या ५ रुपक कथा :**
मृगजळातील कळ्या, सोनेरी सावल्या, वनदेवता, वेचलेली फुले, कलिका

***विजेते स्पर्धक :***

१) **सौ. पुष्पलता सर्जेराव पाटील,** C/o. सर्जेराव शामराव पाटील, मु.पो. पेठ, ता. वाळवा, जि. सांगली-९.
२) **आनंद ठाकूरदेसाई,** २१बी१२ इंडियन एअर लाइन्स कॉलनी, कालिना, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - २९.
३) **उषा दि. कंठे,** बनोसा, दर्यापूर, जि. अमरावती - ४४४८०३.

## सप्टेंबर९८ स्पर्धा (२) पुस्तकांची नावे ओळखा. निकाल

१) **मोडेन पण वाकणार नाही**
२) **झोंबी, नांगरणी, घरभिंती, काचवेल**
३) **ते दिवस ती माणसे**
४) **परिचय**
५) **आय डेअर : किरण बेदी**
६) **सांगावेसे वाटले म्हणून...**

**विजेते स्पर्धक :**

१) **अनिता दाते,** 'सावली' थळ, अलिबाग, जि. रायगड - ४०२२०७.
२) **गुणवंत ज. चौगुले,** समाजवादी प्रबोधिनी, इंड. इस्टेट, शाहू पुतळा, इचलकरंजी, जि. कोल्हापूर - ४१११११५.
३) **सूर्यकांत लोखंडे,** द्वारा मातृभूमि सार्वजनिक वाचनालय, मु.पो. भातांगळी, ता.जि. लातूर-४१३५१२, मराठवाडा.

***सर्व भाग्यवंत विजेत्यांचे अभिनंदन!***

## T Book Club
### ग्रंथप्रेमींसाठी आकर्षक योजना

या बुक क्लबचे सभासद २० रुपये भरून होता येते. या क्लबअंतर्गत दरवर्षी गाजलेल्या सहा इंग्रजी पुस्तकांचे अनुवाद प्रकाशित केले जातात. सभासद झाल्यास ही पुस्तके आपण निम्म्या किंमतीत मिळवू शकता. जसजशी पुस्तके प्रकाशित होतील, तसतशी आपणांस त्यासंबंधीची माहिती कळवली जाईल. आपण ही सर्व सहाही पुस्तके घ्यावयाची आहेत.

***T* बुक क्लब-८** *मधील दुसरे पुस्तक उपलब्ध आहे.*

*एबोला :* केवळ एक विषाणू नव्हे तर साक्षात् यमदूत! आफ्रिकेच्या घनदाट जंगलातून बाहेर पडून, अमेरिकेच्या राजधानीत मृत्युचं थैमान घालणाऱ्या *एबोला* विषाणूचा, मानवाच्या अस्तित्वालाच आव्हान देणारा चित्तथरारक प्रवास....

## द हॉट झोन

मूळ लेखक : **रिचर्ड प्रेस्टन**
अनुवाद : **डॉ. प्रमोद जोगळेकर**

■ मूळ किंमत **रु. २००.००** ■ सभासदांना **रु. १००.००**

सभासद फी २०रु. व पोस्टेज १५रु. मिळून एकूण १४५रु. मनीऑर्डरने पाठवावे अथवा पुस्तक समक्ष येवून घेऊन जावे.

### आतापर्यंतच्या बुक क्लब मधील उपलब्ध पुस्तके

| पुस्तकाचे नाव | मूळ लेखक | अनुवाद |
|---|---|---|
| मध्यस्थ | फ्रेडरिक फोरसीथ | लीना सोहोनी |
| वाईल्ड कार्ड | रेमंड हॉकी/<br>रॉजर बिंग हॅम | अरुण मांडे |
| लव्ह स्टोरी | एरिक सेगल | अनिल इनामदार |
| सिटाडेल | ए. जि. क्रोनिन | मंगला निगुडकर |
| नो कम बॅक्स | फ्रेडरिक फोरसीथ | विजय देवधर |
| हे बंध वात्सल्याचे | हेरॉल्ड रॉबिन्स | योगिनी वेंगुर्लेकर |
| तू असा जवळी रहा | हेरॉल्ड रॉबिन्स | पद्मा अभ्यंकर |
| मुखवटे | ॲगाथा ख्रिस्ती | शर्मिला गाडगीळ |
| पाषाण | ॲगाथा ख्रिस्ती | शर्मिला गाडगीळ |
| नाईट | इली वायझेल | आशा कर्दळे |
| द मिरर क्रॅकड | ॲगाथा ख्रिस्ती | श्रीनिवास गुळवणी |
| हंट द मॅन डाऊन | विल्यम ह्यूमन | अरुण डावखरे |
| ट्रिनिटीज चाईल्ड | विल्यम प्राक्नो | अनिल काळे |
| साक्षी | सरला बार्नबस | स. वा. मुळे |
| सिटी ऑफ जॉय | डॉमिनिक लॅपिए | अनिल कुलकर्णी |
| नॉट विदाऊट माय डॉटर | बेट्टी महमूदी | लीना सोहोनी |
| द टर्मिनल मॅन | मायकेल क्रिश्टन | अरुण मांडे |

'इल्यूजन्स' ही इंग्रजीतील गाजलेली कादंबरी आता मराठीत आली आहे आणि ती वाचताना एखाद्या भारतीय सिद्धपुरुषाचीच कहाणी आपण वाचत आहो असे वाटेल. या सिद्धपुरुषाला पेट्रोलशिवाय विमान चालवणे, ते विमान हवे तेथे उतरवता येणे, दुसऱ्याच्या रोगांचे निवारण करणे, दुसऱ्याच्या मनातील विचार जाणणे, गूढ पण अर्थपूर्ण अशी वचने सांगणे, भिंतीमधून चालत जाणे, (देह हा आभास आहे. भिंत हा आभास आहे. पण त्यांचे अस्तित्व खरे आहे. भिंत ही उभी जमीन. आडव्या आभासावर जर मात करता येते तर उभ्या आभासावर का नाही?), पूर्वजन्मांच्या स्मृती सहजपणे सांगणे, वगैरे सिद्धी त्याला अवगत आहेत. या महात्म्याचे नाव डोनाल्ड शिमोदा डॉन असाही त्याचा उल्लेख होतो. या कथेचा निवदेक रिचर्ड हा वेगवेगळ्या गावी जाऊन आपल्या बायप्लेनमधून तीन डॉलरमध्ये शेतकऱ्यांना हवेत चक्कर मारून आणण्याचा उद्योग करणारा आहे. १९२९च्या अमेरिकन आर्थिक मंदीच्या काळातला हा सर्व प्रकार आहे. एकदा इलिनॉइसच्या फेरिस या गावी त्याला खाली शेतात एक जुने पांढरे सोनेरी ट्रॅव्हल एअर-४००० हे विमान दिसते. तेव्हा तो या एवढ्या अडचणीच्या जागी हे विमान कसे या विचाराने आपले विमानही खाली घेतो. त्या विमानाचा चालक डोनाल्ड शिमोदा - त्याला सँडविचेस खायला देतो. त्याच्या विमानावर एकही ओरखडा नसतो, काउलिंगवर तेलाचे डाग नसतात, कॉकपिटमध्ये गवताचे एकही पाते नसते, पंख्यावर चिरडलेले किडे नसतात. जणू ते नवे करकरीत विमान आहे असेच वाटत असते. "पाच आठवडे मी या विमानाचे प्रवास करतोय" हे डॉनचे बोलणे रिचर्डला खरेच वाटत नाही. तो म्हणतो, "तू खरं का बोलत नाहीत?"

"मी तुला सत्यच सांगतोय, रिचर्ड"

"ट्रॅव्हल एअरमधून एक महिना प्रवासी घेऊन हिंडत असलास तर कुठंतरी तेलाचे डाग, धूळ, ताडपत्रीवर एखादा जोड, गवताचं पातं - काहीतरी दिसायला हवं ना?"

तेव्हा डॉन स्मित करीत उत्तर देतो, "अशा काही गोष्टी असतात की ज्या तुम्हांला माहीत नसतात."

त्यावेळी तो कोणी परग्रहावरून आलेला दूत आहे असे रिचर्डला वाटते.

"मला सर्व गोष्टी माहीत नाहीत हे खरे आहे. मला त्या सर्व माहीत होतील तेव्हा हे माझं विमानही मी तुला हवं तर देईन. कारण उडण्यासाठी त्याची गरजच मला पडणार नाही." या रिचर्डच्या उत्तरावर डॉनची प्रतिक्रिया अर्थातच कुतूहलपूर्ण आनंदाची असते.

रिचर्ड त्याला पुढे सांगतो, "एअरो डायनॅमिक्सच्या प्राथमिक तत्त्वाप्रमाणे कुणालाही हवेत उड्डाण करता येत नाही. पण मला वाटते की दुसरेही एखादे तत्त्व असावे. म्हणजे आपण उडू शकतो, भिंत पार करू शकतो, ग्रहांवर जाऊ शकतो - आणि त्यासाठी विमानाची किंवा अन्य यंत्राची गरज नाही. ही सिद्धी आपल्याला हस्तगत करता येईल असे वाटते.



**आपल्या आवडीचे सोपे पदार्थ करण्यात मुलांनाही गंमत वाटेल**

# मुलांसाठी गंमती-जमतीचा स्वयंपाक

**मूळ लेखिका : रोहिणी सिंग**
**अनु.: आशा परूळेकर**

हे तसे पाहिले तर पुस्तक आहे पाकशास्त्रावरचे. परंतु अगदी वेगळ्या प्रकारचे आहे. या पुस्तकाची एकूणच संकल्पना वैशिष्ट्यपूर्ण आहे. मुलामुलींना विविध प्रकारचे खाद्यपदार्थ करता यावे, आई घरी नसताना फारसा पसारा न मांडता आवडीचे पदार्थ करता यावे, आई घरी नसताना फारसा पसारा न मांडता आवडीचे पदार्थ तयार करून खाता यावे या दृष्टीने त्यांची मानसिकता घडवणारे आणि असे विनासायास करता येणारे काही पदार्थ बनविण्याची प्रेरणा देणारे हे पुस्तक आहे. स्वयंपाक ही एक किचकट व त्रासदायक बाब आहे असे न मानता, ती एक इतर खेळांप्रमाणेच मजेशीर गोष्ट आहे; आणि भातुकलीच्या खेळाचेच एक प्रकारे ते तर्कशुद्ध विकसित रूप आहे असे रोहिणी आंटी याचे मत आहे. मोकळा वेळ असेल तेव्हा स्वयंपाकघरात जाऊन सोप्या पाककृती करायला लागा. आपल्या हाताने केलेल्या डिशेस खातानाही आनंद वाटेल. मित्रमैत्रिणींनाही त्या खाऊ घालून आपल्या पाककौशल्यातील प्रावीण्याची दादही मिळवता येईल. आयष्यभर साथसोबत करून समाधान देणारी ही कला आहे. आपल्या सर्जनशीलतेलाही आव्हान देणारा हा छंद आहे. या अर्थाने हे छोटे पुस्तक म्हणजे एक गमतीजमतीच्या राज्यात प्रवेश करण्याचा पासच आहे' असे रोहिणी आंटी म्हणतात; ते योग्यच आहे.

रोहिणी आंटीने प्रथम कृती दिल्या आहेत त्या सँडविजेस बनविण्याच्या. चवदार सँडविच तयार करण्यासाठी प्रथम ब्रेडचा तुकडा फळीवर ठेवून डाव्या हाताने दाबून धरून, त्याच्या कडा उजव्या हातातील सुरीने अलगद कापा. सुतार करवत मागेपुढे करतो व लाकूड कापतो, त्याप्रमाणे कडा कापलेला ब्रेड ओलसर कापडात लगेच गुंडाळून ठेवा. नाहीतर कोरडा पडू लागतो. बटरही आधीच फ्रीजबाहेर काढून ठेवा. थोडे नरम पडू द्या. दोन ब्रेड स्लाइसमध्ये काय सारण घालायचे ते ठरवा. हे सारण ज्या प्रकारचे, ते नाव त्या सँडविचला मिळेल. उदा. चीज सँडविच, काकडी सँडविच, सलामी किंवा हॅम सँडविच, जॅम सँडविच.